

**संघटनात्मक कार्याची गती प्रेरणा देणारी** : हाडाचा कार्यकर्ता कसा असतो ? दिलेले दायित्व जबाबदारीने पार कसे पाडावे ? निष्ठा, विचार ठेवून पक्ष कार्य कसं करावं ? हा आदर्श राम कुलकर्णी यांच्याकडे घेण्यासारखा असून प्रवक्ता पदावर सक्षमपणे काम करताना संघटनात्मक कार्याची त्यांची गती इतरांना प्रेरणा देणारी असते. नि:स्वार्थ भुमिका आणि विचारासाठी लेखणी चालवतात. मागच्या अनेक वर्षापासून त्यांची पत्रकारिता आम्ही पहात आहोत.
**ना.देवेंद्र फडणवीस, (उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य.)**



**रामभाऊंच्या निष्ठेला तोड नाही** : रामभाऊ माझ्या कुटुंबापैकीच सदस्य असून तीस वर्षांपासून आम्ही त्यांना ओळखतो. लहानपणीच साहेबांच्या जीवाभावाचा पत्रकार हे आम्ही पाहिलेला आहे. त्यांचं लिखाण, निष्ठा याला तोडच नाही. पण, नेतृत्व वाढीसाठी त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून केलेली साहेबांची सेवा कमालीची म्हणावी लागेल. साहेबांचं त्यांच्यावर खूप प्रेम होतं हे आम्ही पाहिलं. साहेबांच्या जाण्यानंतर आमच्या पाठीशी खंबीरपणे रामभाऊ उभे राहिले. मोठ्या भावाने बहिणीची काळजी कशी घ्यावी ? हे त्यांच्या प्रत्यक्ष कृतीभावेतून नेहमीच अनुभवायला येतं. त्यांच्या स्वभावातला आपलेपणा, ऋणानूबंध टिकविण्याचा त्यांचा असलेला छंद बरंच काही सांगून जातो. अशा जीवाभावाच्या बंधूला वाढदिवसानिमित्त शुभेच्छा..! **पंकजाताई मुंडे (राष्ट्रीय सचिव, भाजपा.)**



**रामभाऊ एक एक आदर्श प्रवक्ता** : मागच्या काही दिवसांपासून प्रवक्ता पदावर काम करताना मी, रामभाऊ कुलकर्णी यांना पहातो आहे. वेगवेगळ्या प्रश्नांवर त्यांचे लिखाण आणि भाष्य हे पक्षाला प्रबळता देणारे असते. विरोधकांवर हल्ला चढविण्याची त्यांच्या अंगी असलेली हिंमत आणि संघटनात्मक कार्यात हिरारीचा सहभाग नेहमीच असतो. एक आदर्श प्रवक्ता आणि त्यांच्यातली कार्यमान क्रियाशीलता आदर्श घेण्यासारखीच वाटते.
**-आ.चंद्रशेखर बावनकुळे (प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र भाजपा.)**



**रामकाका कुटुंबातील सदस्य** : रामकाका कुटुंब सदस्य आहेत. स्व.विमलताई मुंदडा यांच्या सहवासात अनेक वर्षे त्यांनी घालवले. काकाजी आणि अक्षय यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. त्यांची पत्रकारिता आमच्या सारख्या पुढाऱ्यांना विकासकामे करण्यासाठी प्रेरणा देणारी असते. प्रवक्ता म्हणुन ते त्यांची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतात. सामान्य जनता आणि कार्यकर्त्याला पत्रकारितेतून न्याय मिळवून देण्याचे काम ते करतात.
**आ.नमिताताई मुंदडा (आमदार, केज विधानसभा मतदारसंघ.)**

# राम कुलकर्णी ज्यांचे पाय जमिनीवर..!


आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १५ मार्च २०२४


## जीवेत शरदः शतम्



लेखणीच्या बळावर पत्रकारितेचं भूषण बनलेला राम आज खऱ्या अर्थाने आयुष्याची 55 वर्षांचा आयुष्याचा डोंगर पार करताना इतरांच्यासाठी आदर्शव्रत व्यक्तिमत्व होऊन बसलं यात शंका नाही. अत्यंत गरिबी आणि आता चांगले दिवस, मान-प्रतिष्ठा कमालीची, विविध राजकिय पक्ष नेत्याच्या जवळचा म्हणुन ज्यांचा उल्लेख केला जातो स्व.गोपीनाथराव मुंडे, स्व.विमलताई मुंदडा यांचा निष्ठावान सैनिक ते आज दुसऱ्या पिढीत पंकजाताई, डॉ.प्रितमताई, आ.नमिताताई मुंदडा यांच्या पाठीशी एकनिष्ठ रहाताना तत्वाशी कधीच तडजोड केलेली नाही. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दुसऱ्यासाठी परोपकाराने जगणाऱ्या अशा सद्गुणी व्यक्तीमत्वाची समाजाला नेहमीच गरज वाटते. त्यामुळेच राम काकाची लोकप्रियता सर्वांच्या तोंडी असते. राम कुलकर्णी म्हटलं की, पत्रकारिता क्षेत्रातील एक लेखक ज्यांनी लेखणीच्या बळावर 35 वर्षापासून बीड जिल्ह्यात सामाजिक तथा विकासाच्या प्रक्रियेत हातभार लावलेला असुन वंचित, उपेक्षित, शेतकरी, कष्टकरी, महिला एवढेच नव्हे तर ज्यांना कुणी नाही त्यांचा आवाज लेखणीतून बनणारा पत्रकार म्हणजे राम कुलकर्णी. राजकिय विश्लेषण वस्तुस्थितीवर आधारीत असतं. बीड जिल्ह्याच्या सामाजिक आणि भौगोलिक तथा राजकिय परिस्थितीचा त्यांना चांगला अंदाज आहे. त्यांची लेखणी भल्याभल्याच्या डोळ्यात अंजन घालणारी प्रसंगी आश्रु ढाळणारी असल्याने खरी ताकद त्यांच्या लेखणीतच म्हणावी लागेल. मागे पाहिल्यानंतर स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व.विमलताई मुंदडा यांच्या नेतृत्वासाठी त्यांनी लेखणीच्या माध्यमातुन केलेली सेवा कुणीच विसरू शकत नाही. गोपीनाथराव मुंडे साहेबांसोबत हनुमान सेवा त्यांना घडलेली आहे. विश्वासू सैनिक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. आज ही देवासमान त्यांचं कुटुंब साहेबांवर भक्ती ठेवुन आहे. तसं पाहता धुनकवाड (ता.धारूर) सारख्या गावात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक शिक्षणासाठी मामाचं गाव देवळा (ता.वडवणी) येथे प्रा.राजेभाऊ कव्हाळे यांच्याकडे झालं. तदनंतर माजलगाव, आंबेवडगाव आणि नंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी अंबाजोगाईत 1984 साली स्थायिक झाले. चंगळवाद त्यांना मुळीच मान्य नाही. कारण कौटुंबिक परिस्थिती अतिशय हलाखीची त्यांनी पाहिलेली आहे. एका भाकरीची किंमत काय असते ? ही अनुभवाची शिदोरी जीवनात ते अधुनमधुन सोडून पहातात. ज्यामुळे त्यांच्या मनाची संवेदनशीलता परोपकाराची होवुन बसली. कॉलेज मध्ये शिक्षण घेताना विद्यार्थी परिषदेचे काम चालु केलं. काश्मिर बचाव आंदोलन यातला त्यांचा सहभाग कमालीचा होता. 370 कलम आज केंद्र सरकारने हाटवले पण तत्कालीन काळात श्रीनगरच्या लाल चौकात जावुन तिरंगा फडकवणाऱ्या मोहिमेत राम यांचा सहभाग होता. स्व.मुंडे साहेबांचा सहवास आल्यानंतर 25 वर्षांपासून भाजपात सक्रियपणे काम करतात. ज्या महाविद्यालयात शिक्षण घेतलं, त्याच महाविद्यालयाचे अध्यक्ष म्हणून नव्हे तर भाशिप्र संस्थेचे संचालक म्हणून काम करत आहेत. सर्वांग प्रसंगाचा अनुभव त्यांच्या पाठीशी असल्याने केवळ पत्रकारिताच नव्हे तर राजकारण, शिक्षण, अध्यात्म आणि समाजकारण कुठल्याही क्षेत्रात संधी मिळाल्याबरोबर निष्ठेने काम करणे हा त्यांचा मुळ पिंड आहे. कधी कधी हा माणुस स्वतःसाठी जगतच नाही असं लक्षात येतं. त्यांची भुमिका नेहमीच सहकार्याची असते. कुणाचा द्वेष करणे, निंदा करत, तिरस्कार करणे या गोष्टी त्यांच्या स्वभावाला शिवत नाहीत. सत्य आणि प्रामाणिकपणा शिवाय मित्र जोडणे आणि संवादातून सुसंवाद घडवणे ज्यामुळे कुठल्याही प्रसंगात त्यांचं असणं फुलाची पाकळी फुलल्यासारखं आनंद मिळवुन देणं असंच म्हणावे लागेल. लहानपणापासून त्यांचा पिंड राष्ट्रभक्ती, सेवाभाव विचारधारेने प्रेरित असल्याने संघ परिवार, भाजप तथा विद्यार्थी परिषद अर्थात हिंदुत्वाची भूमिका, राष्ट्रभक्ती त्यांच्या वर्तनात नेहमीच दिसून येते. राम कसा ? तर इतरांना आदर्श देणारा एक राजकिय कार्यकर्ता आणि एक पत्रकार असंही म्हणता येईल. कारण, स्वतःच समाजात जगताना आदर्श आचरण त्यांच्याकडून पाळल्या जाते. मुंडे साहेबानंतर पंकजाताईच्या पाठीमागे खंबीरपणे उभा राहण्याची भूमिका त्यांनी घेतली. निःस्वार्थ भाव त्यांच्यातला अनेकांना आकर्षित करणारा ठरतो. संधी मिळाली की त्या पदावर छंद म्हणुन ते काम करतात. कुठल्याही पदाकडे उपजीविकेच्या माध्यमातून कधीच पहात नाहीत. महाविद्यालय कसे चालवावे ? एखाद्या शिक्षण संस्थेचं संचलन कसं करावं ? अध्यात्मिक कार्यक्रमात पुढाकार कसा घ्यावा ? एव्हाना पक्ष कार्यकर्ता म्हणुन निष्ठेने आणि विचाराने काम कसं करावं ? याचं उत्तम उदाहरण म्हणजे राम कुलकर्णी. आपलेपणाचं नातं निर्माण करून मन जिंकण्याची त्यांची वृत्ती उल्लेखनीय वाटते. भाजपाच्या प्रवक्तेपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी मागच्या पाच वर्षांपासून कर्तव्याने दायित्व पार पाडताना निष्ठेने केलेले पक्ष कार्य नोंद घेण्यासारखंच म्हणावे लागेल. प्रवक्ता बोलका असावा, बिनधास्त असावा, त्यांनी संजय राऊत सारख्यांना देखील नोंद घ्यावी लागेल अशी जबाबदारी निभावली. त्यांच्या स्वभावात दिशा दर्शक जाणवते. राज्य सरकारला देखील अनेक निर्णय त्यांच्या सुचनेवरून घेण्यास भाग पाडतात. राज्याचे उपमुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस असोत किंवा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे असोत वेळप्रसंगी सुचना करायला मागे हटत नाहीत. त्यांचं लिखाण नेहमी सामाजिक कार्यावर आधारीत असतं. महिलांच्या उत्थानासाठी केलेलं लिखाण असेल किंवा ज्या कुटुंबात लेकरं आई-वडिलांना विचारत नाहीत, अशांच्यासाठी सरकारनं कायदे करावेत यासाठी देखील त्यांनी झुंजार लेखणी चालवली. पत्रकारितेत स्व.मोतीरामजी वरपे दादा, स्व. रत्नाकरजी वरपे याशिवाय जेष्ठ पत्रकार नानासाहेब गाठाळ, स्व.भालचंद्र मोटेगावकर असे अनेक आदर्श त्यांच्या डोळ्यांसमोर नेहमीच बोलण्यातुन साक्ष देणारे ठरतात. कुटुंबात हा माणुस कसा वागतो ? हा जेव्हा अनुभव घेण्याचा प्रयत्न केला खरं तर त्यांचं संपुर्ण कुटुंब एकत्रित आजही आहे. मेजर प्रा.एस.पी.कुलकर्णी, बीड मध्ये कल्याण कुलकर्णी, बहिण सविता, किशोरी, वहिनी अपर्णा, उर्मिला हा साऱ्या कुटुंबात असलेला आपलेपणा वडिलोपार्जित वारसा परिवार पुढे चालवतो. मातृसंस्था उषा काकु आपल्या लेकराचं कौतुक घरबसल्या आजही पहातात. मनाचा मोठेपणा ठेवून जीवन जगावं हा वारसा त्यांना वडिलांकडूनच आलेला आहे. आपल्या धुनकवाड अर्थात धुनकेश्वर गावाशी त्यांचं असलेलं नातं नेहमीच जाणवतं. गावच्या लोकांना घरचं समजल्याचा त्यांचा भाव कल्याणकारी वाटतो. नाते, गोते, पाहुणे यांना सोबत घेवुन जगावं एव्हाना आपल्याला परमेश्वराने जीवन जगण्यासाठी दिलेली ताकद ही किमान आपल्या लोकांसाठी, समाजासाठी एवढेच नव्हे तर गरजुंसाठी असते हा त्यांचा आंतरिक मनाचा भाव बोलका वाटतो. सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे राम काका आज सामाजिकदृष्ट्या यशाच्या उंच शिखरावर आहेत. राज्यभरात प्रतिष्ठा आणि स्वअस्तित्व त्यांनी निर्माण केलं. ज्यांना दिवसागणिक मंत्री, खासदार, आमदार यांचे एकदा तरी फोन येतात. पण, या माणसाच्या डोक्यात अहंमपणाची हवा कधीच पहायला मिळत नाही. मी फार मोठा ? मी जगावेगळा ? हे अवगुण त्यांच्या वर्तनात पहायला मिळत नाहीत. त्यांना फोन लावण्यासाठी लोक चार वेळा विचार करतात. पण, जवळ आल्यानंतर यांचे पाय जमिनीवर असुन आम जनतेपैकी हा माणुस आहे. याची प्रचिती सर्वांनाच येवून जाते. खरं तर त्यांच्या वैवाहिक जीवनात खऱ्या अर्थाने अर्धांगिनी असलेल्या पुजा काकुंचा सिंहाचाच वाटा म्हणावा लागेल. सहचारिणी खंबीरपणे पाठीशी असेल तर माणूस कसं यश मिळवू शकतो ? याचं उत्तम उदाहरण त्यांचं कुटुंब होय. अन्नपुर्णेचा सहवास या परिवाराला लाभला असल्याने सुख - शांतीचा मार्ग इथे सापडतो हे नक्कीच. असो. त्यांचं वर्णन करायचं झालं तर एक पुस्तकच लिहावं लागेल. मात्र एक गोष्ट नक्कीच आहे की, परमेश्वराने अशा चांगल्या शुद्ध कर्माच्या माणसाला चांगलं आयुष्य आणि यश मिळवून द्यावे हीच आमची प्रार्थना.














मांडणी व सजावट
अतुल ह. खंडागळकर

**लेखक : प्रा.डॉ. बिभीषण फड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई)**





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

काही मंडळी मोबाईलवर गाणी वाजवीत जात असतात. त्याशिवाय रात्रीची झोप आणि पहाटेची शांतता भंग करणारे बेवारशी कुत्र्यांचे आवाज आहेतच. आपण म्हणतो सकाळची रम्य आणि शांत वेळ ! पूर्वी कधी तरी नक्कीच पहाट रम्य आणि शांत असावी त्याशिवाय आमच्या ऋषीमुनींना आणि साहित्यिकांना इतक्या सुंदर सुंदर साहित्यरचना कशा सुचल्या असत्या ! परवाच्या दिवशी एका स्वागतसमारंभाला जाण्याचा योग आला. बरेचसे नातेवाईक त्या दिवशी एकमेकांना बऱ्याच दिवसांनी भेटत होते. खूप दिवसांनी भेटी होत असल्याने बोलण्यासारख्या बऱ्याच गोष्टी होत्या. पण ज्यांनी तो कार्यक्रम आयोजित केला होता, त्यांनी त्याच वेळेला एक गाण्यांचा कार्यक्रमही ठेवला होता. एकाच हॉलमध्ये स्टेजवर वधुवर, त्याच ठिकाणी जेवणाची व्यवस्था आणि तिथेच गाणी. गाण्यांचा ऑर्केस्ट्रा ठेवण्याचा आयोजकांचा उद्देश चांगला असेलही, पण तिथे खूप दिवसांनी भेटलेल्या आप्तेष्टाना एकमेकांशी संवाद साधणे देखील कठीण होत होते एवढा गाण्यांचा आवाज मोठा होता. गाणी ऐकण्याच्या मनस्थितीत फारसं कोणी दिसत नव्हतंच. कोणाशी बोलायचं झाल्यास अगदी दुसऱ्याच्या कानाजवळ तोंड नेऊन बोलावं लागत होतं. उपस्थितांनी तशाच वातावरणात जेवणाचा आस्वाद घेतला. वधूवरांना शुभाशीर्वाद दिले. त्या कर्कश आवाजातील गाण्यांऐवजी जर मंजुळ आणि हळू आवाजातील सनईचे सूर असते, तर सगळ्यांनाच किती छान वाटलं असतं ! माझ्या घराशेजारीच एक लग्न होते. लग्नाच्या आधीच्या दिवशी संध्याकाळी हळदीचा कार्यक्रम होता. घरापुढेच मंडप टाकण्यात आला होता. सायंकाळी पाच वाजेपासून कार्यक्रमस्थळी डीजेला सुरुवात झाली. हळदीचा कार्यक्रम पार पडेपर्यंत डीजे सुरु होता. हळदीचा कार्यक्रम पार पडल्यावर डीजे थांबला. मला हायसे वाटले. पण माझा तो आनंद थोडाच वेळ टिकला.



## आनंदी पहाट

## शिक्षणामुळे ज्ञान, आत्मविश्वास वृद्धिंगत होत राहतो

आधुनिक केसरी

स्पर्धात्मक जगात टिकून राहण्यासाठी आपल्या सर्वांना शिक्षणाची मशाल म्हणून गरज आहे. अशिक्षित व्यक्तीला माणूस म्हणून आणि संपूर्ण जगाप्रती असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची पूर्ण जाणीव कधी होऊ शकतेच असे नाही. माणूस म्हणून, आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजाला परत द्यायचे आहे आणि प्रत्येकासाठी राहण्यासाठी एक चांगले ठिकाण बनवायचे आहे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

योग्य शिक्षण एखाद्या व्यक्तीला त्यांच्या आवडीच्या पलीकडे विचार करायला शिकवते आणि पुढील पिढीसाठी जगाला अधिक आनंदी, सुरक्षित स्थान बनवण्याची क्षमता विकसित करण्यात मदत करते. शिक्षण आपल्या सर्वांच्या जीवनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते आणि आपल्या सर्वांसाठी आपल्या सर्वोच्च क्षमतेपर्यंत पोहोचण्याचा मार्ग मोकळा करते. जेव्हा आपण जीवनातील शिक्षणाच्या महत्त्वाबद्दल बोलतो, तेव्हा शिक्षण म्हणजे काय हे समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जीवनातील आधुनिक शिक्षणाचे महत्त्व आणि त्याच्या अनेक पैलूंचा शोध घेत राहणे आवश्यक ठरत असते. शिक्षण हे एक माध्यम आहे, जे आपल्याला आपल्या समाज, कुटुंब आणि राष्ट्राप्रती असलेली कर्तव्ये जाणून घेण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि आदर करण्यासाठी कौशल्य, तंत्र, माहिती आणि ज्ञान देते. त्यामुळे जीवनातील शिक्षणाचे महत्त्व कितीतरी पटीने मोठे आहे. जीवनातील शिक्षणाचे महत्त्व हे आहे, की ते प्रत्येकाला जगाकडे आणि आपल्या समाजाकडे पाहण्याचा एक चांगला दृष्टीकोन विकसित करण्यास मदत करते. शिक्षण आपल्याला नवीन कल्पना मिळविण्यात, शोधण्यात मदत करते. शिक्षण माणसाला ज्ञान मिळवण्यास आणि जीवनात आत्मविश्वास वाढविण्यास मदत करते. आपल्याला आपले करिअर आणि आपली वैयक्तिक वाढ सुधारण्यात मदत करू शकते. सुशिक्षित व्यक्तीच समाजाचा उत्तम नागरिक बनू शकते. आपल्याला जीवनात योग्य निर्णय घेण्यास मदत करते. आधुनिक, विकसित आणि औद्योगिक जग शिक्षणाच्या चाकांवर धावत आहे.



आधुनिक केसरी

## भांडार पुण्याचे तेच जाण ||


येऊनीया जन्मा | लाभावी संगती ||
सत्कर्मासी गती | प्राप्त होते ||१||
घडु नये कधी | संग दुर्जनांचा ||
भंग साधनेचा | होतो जाण ||२||
सज्जनांच्या पायी | लीन व्हावे आता ||
फोडु नये माथा | मुढा पुढे ||३||
सज्जन दुर्जन | घ्यावा पारखून ||
संचिताची खूण | तीच आहे ||४||
संतसंग प्राप्ती | सार्थक जन्माचे ||
भांडार पुण्याचे | तेच जाण ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



## हितगुज



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### उल्हासाचे प्रतीक

महावृक्ष वनस्पती असतात व त्यांच्यात भावुकता नव्हे तर सार्थकता असते. ते फुले देत नाहीत तर फळे देतात. घनदाट विस्तार असलेला वटवृक्ष मर्त्यलोकास अभयदान देण्याच्या मुद्रेत विशालकाय होत जातो. ऊर्ध्वमूल, अधः शाखेची हा साक्षात् अनुभूति करून देतो. आपल्या अनेक जटा-पारंब्यांसहित विकसित होत गेलेला वटवृक्ष शिवाच्या वैराग्याचे मूर्तीमंत स्वरूप आहे. अनेकांना आश्रय, आधार देत आपला महाकाय विस्तार सावधपणे सांभाळत अनंत आकाशाकडे एकाग्रतेने ध्यानमग्न होऊन झेपावणारा वटवृक्ष कौटुंबिक जीवनाचा आदर्श आहे. तसेच भोग व वैराग्य यांचे समन्वयात्मक उत्कृष्ट प्रतीक आहे. गुरुत्वाकर्षणाची जड/अचेतन गतिला प्राणांच्या आवेगाने पराभूत करणार्या उल्हासाचे प्रतीक म्हणजे वटवृक्ष होय. प्रत्येक गावाशी भावात्मक मैत्री करणारा वटवृक्ष, उन्हाळ्यात ही हिरवाईने नटलेला वटवृक्ष जमीनीला सुपीकता देणारा, भरपूर नाइट्रोजन उपलब्ध करून देणारा, वातावरण शुद्ध, शीतल, प्रदूषण मुक्त ठेवणारा वृक्ष आहे. भारतीय संस्कृतीने, अध्यात्माने देवी, देवतांना, मुक्ती व ज्ञानाला, जीवन प्रवाहाला वृक्ष, अरण्ये, नद्या, पर्वत इत्यादींशी जोडून मानवी मनाला उच्चतेकडे नेले आहे. वृक्ष देवतांची लौकिक रूपे आहेत, निवासस्थाने आहेत. ते साधन व साध्य दोन्ही आहेत. वड, पिंपळ, औदुंबर, चंदन, बेल, नारळ, अशोक, पारिजात, देवदार, कदंब, बकुळ, मांदार, अशी लक्षावधी झाडे आध्यात्मिक संस्कारांचे वाहक व श्रद्धेची ठिकाणे आहेत. 27 नक्षत्रांशी एक-एक वृक्ष जोडून पर्यावरण व खगोलशास्त्र यांच्या समन्वयाने ज्योतिर्ज्ञान भारताने विकसित केले आहे. भारतीयांनी लौकिकतेला अलौकिकतेशी, नश्वरला अनश्वरतेशी, भावनेला चिद्तत्वाशी जोडणारा ज्ञानप्रवाह विकसित केला आहे. संस्कार, पर्व, अनुष्ठाने, कुलाचार, सणवार या ज्ञानप्रवाहाची प्रात्यक्षिके आहेत.

संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक
संपर्क क्र. ९९२२४२००३४

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सहनाई डफ झाँझ है,
कींकिण बाँय सोहाय ।
दायें सिंह गर्ज्जन गजै, सब मिलि करत
बधाय ।।३२।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल प्रथम
अध्याय) ०२/०१/३२ मूळ भाष्याचा मराठी
अनुवाद : ब्रह्मांडात डाव्या बाजूला सनई, डफ, झांज आणि कींकिण चा सरस ध्वनी ऐकू येतो. उजव्या बाजूला सिंह गर्जनेचा घोष होत असतो. हे सर्व अनहद मिळून दरवाजा वर अभिनंदन करून आनंद प्रगट करतात. अनहद दारावरील चौघडा आहे , जो ब्रह्मांडात सदैव सुंदर ध्वनीने झंकृत होत असतो.




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## नामात राहणे हा सरळ मार्ग आहे

आधुनिक केसरी

एका बाईला सासरी नामस्मरण करणे कठीण जाई, कारण सासरच्या लोकांना ते आवडत नसे. मी तिला सांगितले, 'लोणी चोरून खाण्याचा परिपाठ ठेवला तरी त्याचा परिणाम शरीरावर दिसतोच. तसे, नाम कुणाला नकळत घेतले तरी त्याचा उपयोग होतोच; म्हणून उघडपणे नाम न घेता आले तरी ते गुप्तपणे घ्यावे, आणि त्याप्रमाणे युक्तीने वागावे.' शरीराला अन्नाची जरूरी असताना जर ते तोंडातून जात नसेल तर नळीने पोटात घालतात, त्यामुळे ते लवकर पोटात जाते; तसे, भावनेच्या नळीने नाम घेतले तर ते फार लवकर काम करते. एक मनुष्य बैलगाडीतून जाताना रस्त्यामध्ये पडलेला होता. एका सज्जन माणसाने त्याला उचलून आपल्या घरी नेले आणि त्याच्यावर उपचार केले. तसे आपण भगवंताच्या नामात पडून राहावे; त्यात राहिले की कुणीतरी संत भेटतो आणि आपले काम करतो; आपण सरळ मार्गात मात्र पडले पाहिजे. नुसत्या विषयात राहणे हा आडमार्ग आहे; नामांत राहणे हा सरळ मार्ग आहे.



खरोखर, नाम किती निरुपाधिक आहे ! आपण देहबुद्धीच्या उपाधीत राहणारे लोक आहोत, म्हणून आपल्याला नामाचे महत्त्व तितकेसे समजत नाही. संतांनाच नामाचे खरे महत्त्व कळते. विलायत इथून हजारो मैल लांब आहे. तिथे जाऊन आलेल्या लोकांकडून आपल्या तिथल्या गोष्टी ऐकतो. तिथे आपण पायी जाऊ शकत नाही. कारण ते फार लांब आहे. शिवाय, वाहनामध्ये बसून जावे म्हटले तर मध्ये मोठा समुद्र आहे. तेव्हा, पायाला श्रम न होऊ देता, आपल्याला बुडू न देता, समुद्राचे पाणी पायाला न लागता, समुद्रपार नेणारी जशी आगबोट आहे, त्याचप्रमाणे भगवंताकडे पोहोचविणारे त्याचे नाम आहे. भगवंत कसा आहे तो आम्ही पाहिला नाही, पण संत त्याला पाहून आले आणि त्यांनी त्याचे वर्णन आमच्याजवळ केले. आम्ही आमच्या कष्टाने त्याला गाठू म्हणावे तर ते शक्य नाही. शिवाय, प्रपंचासारखा एवढा भवसागर मध्ये आडवा आलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये आपण नाम घट्ट धरले तर सुखाने भगवंतापर्यंत जाऊन पोहोचू. व्यवहारामध्ये जशी एकाच माणसाला अनेक नावे असतात, तो त्यांपैकी कोणत्याही नावाला 'ओ' देतो, तसे कोणत्याही नावाने हाक मारली तरी एकच भगवंत 'ओ' देतो. निरनिराळ्या गावी असलेल्या सर्व जिंदगीची मालकी खरेदीपत्रातल्या नामनिर्देशाने मिळते, तसे सर्वव्यापी असलेल्या देवाची प्राप्ती त्याच्या नामाने होते. खरोखर, नाम ही कधीही नाहीशी न होणारी जिंदगीच आहे.

**५०. आपण सर्वांनी 'मी भगवंताकरिता आहे' असे मनाने समजावे आणि सदैव त्याच्या नामात राहावे.**



## ब्रम्हनिरूपण

सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

दरवर्षी न चुकता गुरूपौर्णिमा साजरी करतो. सद्गुरूंच्या जन्म दिवसाचे पुण्यदिनाचे स्मरण करतो. सद्गुरूच्या वचनावर आपलं आयुष्य वचनबद्ध ठेवावं सगळा मार्ग सद्गुरु दाखवतील व आपला जीवनरूपी भार उचलतील यात शंकाच नाही. मित्रांनो समर्थ आपल्याला प्रत्येक शब्दाचा अर्थ आपल्या रोजच्या जीवनातील निगडीत गोष्टींची तुलना करून देतात. की आपल्याला ते सहज सोपे वाटावे.

शुक्रवार, १५ मार्च २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - २०२
आरएनआय : एमएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 15 MARCH 2024 adhunikkesari.com ●YEAR-03 ●ISSUE-202 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05

# १८ ओटीटी ॲप्सवर सरकारकडून बंदी

## माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या तरतुदीनुसार बंदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : केंद्र सरकारने गुरुवारी अश्लील, असभ्य, पोर्नोग्राफिक सदृश्य साहित्य प्रसारित केल्याबद्दल १८ ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी घातली आहे. अनेक सोशल मीडिया अकाऊंटसही बंद केले आहेत.**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने दिलेल्या निवेदनानुसार, अश्लील साहित्य दाखिवणारे १८ ओटीटी प्लॅटफॉर्म, १९ संकेतस्थळ, १० ॲप्स (गुगल प्ले स्टोअरवरील सात आणि ॲपल स्टोअरवरील तीन) आणि ५७ सोशल मीडिया अकाऊंटला बंद करण्यात आले आहे. आता देशभरात कुठेही या साईट्सना पाहता येणार नाही. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग ठाकूर यांनी या निर्णयानंतर सांगितले की, सर्जनशील अभिव्यक्तीच्या नावाखाली ओटीटी प्लॅटफॉर्म्सनी अश्लील, असभ्य सामग्री दाखवली नाही पाहीजे. मंत्रालयाने सादर केलेल्या निवदेनात म्हटले की, माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या तरतुदीनुसार ही बंदी घालण्यात आली आहे. यासाठी इतर खात्याचे मंत्री आणि सरकारच्या विभागांचे मत जाणून घेण्यात आले. तसेच माध्यम आणि करमणूक क्षेत्र, महिला आणि बाल अधिकारासाठी काम करणाऱ्या तज्ज्ञांचीही मते जाणून घेण्यात आली.




**खालील ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी** : ड्रिम्स फिल्म्स, वुव्ही, येस्समा, अनकट अड्डा, ट्री फिलक्स, एक्स प्राइम, निऑन एक्स व्हिआयपी, बेशरम्स, हंटर्स, रॅबिट, एक्स्ट्रामुड न्यूफ्लिक्स, मूडएक्स, मोजफ्लिक्स, हॉट शॉट्स व्हिआयपी, फुगी चिकुफ्लिक्स, प्राइम प्ले.






# आ. नीलेश लंके शरद पवार गटात

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** आ. निलेश लंके गुरूवारी शरद पवारांच्या गटात दाखल झाले आहेत. पुण्यात पत्रकार परिषदत घेऊन निलेश लंके यांनी याबाबतची घोषणा केली आहे. भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची दुसरी यादी बुधवारी जाहीर केली. या यादीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे पुत्र सुजय विखे पाटील यांच्या नावाचा समावेश आहे. सुजय विखे अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. विखेंविरोधात तगडा उमेदवारी देण्यासाठी महाविकास आघाडी प्रयत्नशील आहे. सुजय विखेंविरोधात निलेश लंके यांना उमेदवारी देणार असल्याचे बोलले जात आहे. कोरोना काळात केलेल्या कामामुळे निलेश लंकेंच्या मागे लोक उभा राहू शकतात. शिवाय त्यांच्या संपर्काचा फायदा निवडणुकीत होऊ शकतो. त्यामुळे शरद पवार गट निलेश लंकेंना उमेदवारी देण्याच्या तयारीत आहे. काही दिवसांपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत मी अजून कोणताही निर्णय घेतलेला नाही, मात्र राजकारण कधीही पलटू शकते,असे सूचक विधान निलेश लंके यांनी केले होते. त्यामुळे पुन्हा एकदा लंके शरद पवारांच्या गटात जाणार असल्याच्या चर्चांनी जोर धरला होता.

# पुण्यात शनिवारी पत्रकार संघाचे राज्य अधिवेशन

## उपमुख्यमंत्री फडणवीस करणार उद्घाटन : खा. शरद पवार, संभाजी महाराज, श्रीकांत भारतीय आदींची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे शनिवारी दि.१६ मार्च रोजी सकाळी १० वाजता पुण्यातील चिंचवड येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. समारोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरद पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे. या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे भूषविणार आहेत. सकाळच्या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार संभाजी महाराज, आ. श्रीकांत भारतीय यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाला आ. महेश लांडगे, आमदार आण्णा बनसोडे, आ. श्रीमती अश्विनी जगताप, भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे, आ. उषा खापरे, बालन ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक पुनीत बालन, कोहिनूर ग्रुपचे चेअरमन कृष्णकुमार गोयल, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, राजकीय विश्लेषक उदय निरगुडकर, पत्रकार संघाचे प्रदेश




संघटक संजय भोकरे, शिवसेना उबाठा गटाचे राज्य संघटक गोविंदराव घोळवे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दुपारच्या सत्रात 'अमृतकाळातील माध्यम स्वातंत्र्य, भविष्य आणि पत्रकारितेतील राम' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या परिसंवादात ज्येष्ठ लेखक अरविंद जगताप, ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले, महेश म्हात्रे, संजय आवटे, मंदार फणसे, सम्राट फडणीस, आशिष जाधव सहभागी होणार आहेत. सायंकाकाळच्या सत्रात ४ वाजता राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा रंगणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष, खासदार शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय देऊन सन्मानित केले जाणार आहे. यावेळी खासदार अमोल कोल्हे, आमदार बच्चूभाऊ कडू, राष्ट्रवादी काँग्रेस पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, मनसे नेते अनिल शिदोरे, पत्रकार संघाच्या डिजीटल मीडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष सिध्दार्थ भोकरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. शनिवारी १६ मार्च रोजी आहेर गार्डन (व्हिआयपी बँक्वेट हॉल), चिंचवड येथे होणाऱ्या पत्रकार संघाच्या अधिवेशनात संपूर्ण राज्यातील शहरी, ग्रामीण पत्रकारांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, उपाध्यक्ष नितीन शिंदे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश प्रसिध्दी प्रमुख नवनाथ जाधव, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष पराग कुंकुलोळ, उपाध्यक्ष अतुल क्षीरसागर, महादेव मासाळ, सचिव जमीर सय्यद, कार्याध्यक्ष औदुंबर पाडूळे, खजिनदार मिलींद संधान,संजय माने, योगेश गाडगे, विजय जगदाळे, विकास शिंदे, बेलाजी पात्रे, प्रमोद सस्ते, प्रसाद वडघुले, सागर झगडे, सुनील बेणके, संजय भेंडे, संदीप सोनार, पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी तसेच संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, जालन्याचे जिल्हाध्यक्ष दिगंबर गुजर, परभणीचे जिल्हाध्यक्ष विलास चव्हाण, हिंगोलीचे जिल्हाध्यक्ष प्रद्युम्न गिरीकर, नांदेडचे जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे, लातूरचे जिल्हाध्यक्ष अशोक देडे, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील आदींनी केले आहे.



**पुण्यातील राज्य अधिवेशन ऐतिहासिक होणार :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे शनिवारी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. या अधिवेशनात पत्रकार आणि पत्रकरितेबद्दल दोन सत्रांत विचारमंथन होणार आहे. राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचा गौरव सोहळा होणार आहे, हे राज्य अधिवेशन ऐतिहासिक होईल, असा विश्वास महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी व्यक्त केला.

**या दिग्गजांचा होणार यथोचित सन्मान :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या अधिवेशनात पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल अनेक दिग्गज पत्रकारांचा सन्मान होणार आहे. आश्वासक पत्रकारिता पुरस्कार रवींद्र आंबेकर, उत्कृष्ट पत्रकारिता दिनेश केळूसकर, युध्दवार्ता पत्रकारिता विनोद राऊत, आरोग्य पत्रकारिता संतोष आंधळे, अभिव्यक्ती पत्रकारिता सचिन चपळगावकर, कृषि पत्रकारिता विनोद इंगोले, जिजाऊ पत्रकारिता सुमित्रा वसावे, सद्रक्षणाय पत्रकारिता वैभव सोनवणे, आदर्श पत्रकारिता प्रविण बिडवे, प्रेरणादायी पत्रकारिता सतिष नवले, एकलव्य पत्रकारिता प्रकाश बेळगोजी, शोध पत्रकारिता रोहित आठवले, उत्कृष्ट पत्रकारिता सागर आव्हाड, निर्भिड पत्रकारिता अमोल काकडे तसेच वाशिम पत्रकारिता निलेश सोमाणी, उत्कृष्ट संघटक दशरथ चव्हाण (नवी मुंबई), नयन मोंढे (अमरावती), नितीन शिंदे (ठाणे), महेश पानसे (नागपूर), रमजान मन्सुरी (गुजरात), शिवाजी नेहे (गोवा), राजश्री चौधरी (दिल्ली), किशोर रायसाकडा (जळगाव), रोहिदास गाडगे (पुणे ग्रामीण), भूषण महाजन (जळगाव), शैलेश पालकर (रायगड), राजेंद्र कोरके (पंढरपूर), स्वामी शिरकूल (मुंबई), आरोग्य पत्रकारिता बाबा देशमाने, उपक्रमशील पत्रकारीता प्रभु गोरे (छत्रपती संभाजीनगर), वैभव स्वामी (बीड), आनंद शर्मा (नागपूर), प्रविण सपकाळे (जळगाव), प्रताप मेटकरी (सांगली), अमोल येलमार, प्रदीप शेंडे (नागपूर), आबा खवणेकर (सिंधुदूर्ग), पोपट गवांदे (नाशिक) यांचा गौरव होणार आहे.

# एक राष्ट्र, एक निवडणूक

आधुनिक केसरी

एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्याबाबत मोदी सरकार विचार करत आहे. या संकल्पनेवर अभ्यास करून त्याची अंमलबजावणी कशी करता येईल याबाबत अहवाल सादर करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समतीने त्यांचा अहवाल विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सुपूर्द केला आहे. कोविंद समितीने त्यांच्या अहवालात अनेक मोठ्या आणि महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत. समितीने एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्यासाठी संविधान संशोधन करण्याची शिफारस केली आहे. समितीने अशी शिफारस केली आहे की, सरकारने एक कायदेशीर यंत्रणा तयार करावी, ज्याद्वारे देशभरात एकाच वेळी निवडणुका घेणे शक्य होईल. समितीने तब्बल १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला आहे. केंद्र सरकारने २ सप्टेंबर २०२३ रोजी एका उच्चस्तरीय समितीचे गठण केले होते. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची या समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली होती. या समितीने तब्बल १९१ दिवस 'एक राष्ट्र एक निवडणूक' या संकल्पनेवर काम केल्यानंतर गुरूवारी त्यांचा अहवाल सादर केला. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि या समितीतल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांचा अहवाल सादर केला. या समितीने शिफारस केली आहे की, केंद्र सरकारने एक राष्ट्र एक निवडणूक घेण्यासाठी एक कायदेशीर यंत्रणा तयार करावी. ज्याद्वारे एकाच वेळी संपूर्ण देशभर निवडणुका घेता येतील. या अहवालात कलम ३२४ अ लागू करण्याची शिफारसही समितीने केली आहे. तसेच कलम ३२५ मध्ये सुधारणा सुचवल्या आहेत. त्याचबरोबर कोविंद समितीने एकाच मतदार यादीची (वन वोटर लिस्ट) शिफारस केली आहे. अहवालात म्हटले आहे की, पहिल्या टप्प्यात संपूर्ण देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतल्या जाव्यात. दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, पचायत समित्यांच्या निवडणुका घेतल्या जाव्या. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांनंतर १०० दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेता यायला हव्यात, अशी प्रक्रिया राबवायला हवी. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि या समितीतल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांचा अहवाल सादर केला. या समितीने शिफारस केली आहे की, केंद्र सरकारने एक राष्ट्र एक निवडणूक घेण्यासाठी एक कायदेशीर यंत्रणा तयार करावी. ज्याद्वारे एकाच वेळी संपूर्ण देशभर निवडणुका घेता येतील. या अहवालात कलम ३२४ अ लागू करण्याची शिफारसही समितीने केली आहे. तसेच कलम ३२५ मध्ये सुधारणा सुचवल्या आहेत. त्याचबरोबर कोविंद समितीने एकाच मतदार यादीची (वन वोटर लिस्ट) शिफारस केली आहे. अहवालात म्हटले आहे की, पहिल्या टप्प्यात संपूर्ण देशात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुका घेतल्या जाव्यात. दुसऱ्या टप्प्यात नगरपालिका, नगर परिषदा, महानगरपालिका, पचायत समित्यांच्या निवडणुका घेतल्या जाव्या. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकांनंतर १०० दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेता यायला हव्यात, अशी प्रक्रिया राबवायला हवी, असे मत या क्षेत्रातील मान्यरांकडून व्यक्त होत आहे.



प्रा. शाम हेडाऊ
9834301568

# अखेर मुनगंटीवार यांचे काष्ठपूजन फळाला

आधुनिक केसरी

लोकसभा 2024 ची निवडणूक अवघ्या काही तासात घोषित होईल . या निवडणुकीच्या रणधुमाळी मध्ये संपूर्ण भारतातील महत्त्वाची सीट म्हणून चंद्रपूरकडे सगळ्यांचे लक्ष लागलेलं होतं. त्याचे कारण 2019 मध्ये झालेल्या निवडणुकीमध्ये माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांचा पराभव करीत बाळू धानोरकर यांनी महाराष्ट्रातून काँग्रेस ची एकमेव सीट निवडून येण्याचे श्रेय मिळवलं होतं. तेव्हापासूनच भाजपने ही जागा पुढील निवडणुकीत आपल्याला मिळावी यासाठी चंग बांधला होता. त्या दृष्टिकोनातून 2024 ची निवडणूक लढवायची आणि ही सीट आपल्याकडे परत घ्यायची असा विचार भाजप श्रेष्ठीने केलेला होता.

चंद्रपूरमध्ये मात्र यावर्षी भाजपाची लोकसभेची उमेदवारी कोणाला मिळणार याबाबत प्रचंड रस्सीखेच सुरू होती. माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांना परत उमेदवारी मिळावी अशी चंद्रपूरकरांची इच्छा होती . तर , दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे तडफदार नेतृत्व म्हणून ओळख असलेले सुधीर मुनगंटीवार यांनी लोकसभेच्या दिशेने वाटचाल सुरू केलेली होती. अयोध्या येथील राम मंदिराच्या गर्भगृहासाठी पाठविण्यात येणाऱ्या सागवान लाकूड ( काष्ठ ) चंद्रपूर वरून पाठविण्याचे निश्चित झाल्यानंतर चंद्रपूर मध्ये काष्ठ पूजनाचा भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला देशभर प्रसिद्धी मिळावी या दृष्टिकोनातून सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्लीतील सर्व मीडिया प्रमुखांना चंद्रपुरात बोलविले होते. आणि तेव्हापासूनच सुधीर मुनगंटीवार यांची लोकसभेच्या दिशेने वाटचाल सुरू झालेली होती असं सगळेजण बोलू लागले होते. परंतु मध्यंतरी मराठा ओबीसी आंदोलनाने उचल घेतली आणि ओबीसी चेहरा लोकसभेत जावा या दिशेने सर्वच पातळीवर संपूर्ण राज्यभर विचार विनिमय सुरू झाला. ओबीसी मराठा आंदोलनानंतर सुद्धा सुधीर मुनगंटीवार यांनी भव्य दिव्य अशा मोठ्या कार्यक्रमाचे आयोजन केले . कृषी मेळावा असो , ताडोबा महोत्सव असो , ADVANTAGE चंद्रपूर असो अशा सर्वच कार्यक्रमांमधून नरेंद्र मोदी यांचे भव्य दिव्य कट आउटस , मोठे बॅनर आणि त्यासोबत आपली प्रतिमा , आपले कट आउट आणि बॅनर्स या माध्यमातून जोरदार मोर्चे बांधणी सुरू झाली होती . परंतु व्यासपीठावरून बोलत असताना किंवा प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना सुद्धा माझी लोकसभेत जायची इच्छा नाही. परंतु, पक्षाने आदेश दिल्यास रणांगणात उतरणार असे स्पष्ट विधान मुनगंटीवार करू लागले होते दोन दिवसापूर्वीच झालेल्या बॉटनिकल गार्डन उद्‌घाटन समारंभ मध्ये सुद्धा माझी लोकसभेत जाण्याची इच्छा नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आपले वजन वापरून मला महाराष्ट्रात राहण्यासाठी सहकार्य करावे .असे मनोगत त्यांनी व्यक्त केले होते. आणि लगेच दुसऱ्या दिवशी सुधीर मुनगंटीवार यांना लोकसभेची उमेदवारी जाहीर झाली. वास्तविक पाहता ओबीसी मराठा आंदोलनाने महाराष्ट्रात उचल खाल्ल्यानंतर ओबीसी चेहरा म्हणून माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर आणि ओबीसी नेते डॉक्टर अशोक जीवतोडे या दोन नावांची ही चर्चा सुरू झाली होती . या दोन नावांमध्ये हंसराज अहिर यांना प्राधान्य देण्यात येत होत. कारण , हंसराज अहिर हे चार वेळा खासदारकी निवडून आलेले होते. शिवाय , मोदी आणि शहांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय गृहराज्यमंत्री पदावर सुद्धा त्यांनी आपली मोहर उमटविलेली होती. या दृष्टीने विचार करू जाता आता हंसराज अहिर यांचे पारडे जड मानले जात होते . परंतु शेवटच्या क्षणाला मात्र सुधीर मुनगंटीवार यांचे नाव जाहीर झाले . आणि सुधीर मुनगंटीवार यांच्या कार्यकर्त्यांनी नाव जाहीर होताच त्यांच्या घरासमोर जल्लोषात या निर्णयाचे स्वागत केले . तर सुधीर मुनगंटीवार यांनी सुद्धा लगेच पहिली प्रतिक्रिया देत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत देश कार्यासाठी संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले. सुधीर मुनगंटीवार हे महाविद्यालयिन जीवनापासूनच राजकारणामध्ये सक्रिय राहिलेले होते. स्थानिक सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर येथे शिकत असताना



नागपूर विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीमध्ये ते निवडून आले आणि तिथून त्यांच्या राजकीय कारकीर्दीला हळूहळू सुरुवात झाली . त्यांनी सर्वप्रथम 1987 मध्ये राजकारणामध्ये सक्रिय सहभाग घेतला. आणि 1989 मध्ये पहिल्यांदा ते चंद्रपूर लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचे उमेदवार म्हणून उभे राहिले. परंतु त्या वेळचे काँग्रेसचे खासदार शांताराम पोटदुखे यांनी त्यांचा पराभव केला. तर 1991 मध्ये पुन्हा एकदा



लोकसभेमध्ये मुनगंटीवार यांनी भाजपा द्वारे आपले नशीब अजमावण्याचा प्रयत्न केला . त्यावेळी सुद्धा काँग्रेसचे तत्कालीन केंद्रीय अर्थराज्यमंत्री शांताराम पोटदुखे यांनी पुन्हा एकदा मुनगंटीवार यांना पराभूत केले . आणि तेव्हापासून लोकसभेत जाण्यासाठी मुनगंटीवार यांना अडथळा निर्माण झाला . त्यानंतर लोकसभेत आपल्याला उमेदवारी मिळणार नाही ही गोष्ट लक्षात घेत 1995 मध्ये मात्र त्यांनी चंद्रपूर



विधानसभेवर आपले लक्ष केंद्रित केलं . आणि 1995 मध्ये झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये श्याम वानखेडे यांचा दणदणीत पराभव करून सुधीर मुनगंटीवार विधानसभेमध्ये निवडून आले . आणि तेव्हापासून त्यांनी राजकारणात कधीही मागे वळून पाहिले नाही . 1999 , 2004 ,2009 ,2014 , 2019 अशा सलग निवडणुका त्यांनी जिंकल्या . एवढेच नव्हे तर मतदार संघाच्या पुनर्रचनेनंतर बल्लारशा विधानसभा निर्वाचन क्षेत्रामध्ये सुद्धा त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची मोहोर उमटवत विधानसभेमध्ये आपला झेंडा रोवला. आणि महाराष्ट्रातला एक तडफदार अभ्यासू नेता म्हणून त्यांनी आपला लौकिक निर्माण केला. नेतृत्व , वक्तृत्व आणि कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी अवघा महाराष्ट्र पिंजून काढला . एवढेच नव्हे तर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये सांस्कृतिक कार्य मंत्री , पर्यटनमंत्री , अर्थमंत्री ,वनमंत्री म्हणून दमदार पदही त्यांनी भूषविली. एवढेच नव्हे तर भाजपाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी मध्ये भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी आपला ठसा उमटवला .

मिळेल त्या खात्यामध्ये त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाचा ठसा कायमच उमटवट ठेवला आणि म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रात एक अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखलं जातं . हाती घेतलेल्या विषयाचा संपूर्ण अभ्यास , त्या विषयाचा सातत्यपूर्ण पाठपुरावा , त्यासाठी करावा लागणारा पत्रव्यवहार , त्या पत्राव्यव्हारांचा पाठपुरावा आणि जे काम करायचे ते काम उच्च दर्जाचे करायचे आणि भव्य दिव्य करायचे हा त्यांचा अट्टाहास . शिवाय मीडिया मॅनेजमेंट जबरदस्त . त्यात प्रचंड दांडगा जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांवर असलेली त्यांची जबरदस्त पकड यामुळे सुधीर मुनगंटीवार हे महाराष्ट्रात एक तडफदार युवा नेतृत्व म्हणून ओळखले जाऊ लागले . आणि त्यांच्या या अष्टपैलू गुणांमुळेच सुधीर मुनगंटीवार यांना लोकसभेच्या उमेदवारांची माळ त्यांच्या गळ्यात पडली असे म्हणायला हरकत नाही.

असे असताना सुद्धा दुसऱ्या बाजूला मात्र हंसराज अहिर समर्थकांमध्ये नाराजीची लाट आली आहे . तर अशोक जीवतोडे या ओबीसी नेत्यांची साथ सुधीर मुनगंटीवार यांना मिळणार का ? हा मात्र आता यक्ष प्रश्न समोर उभा राहिलेला आहे. कारण, देशात सर्वत्र मोदी लाट असतांनाही हंसराज अहिर यांचा 2019 मध्ये झालेला पराभव का झाला ? या संदर्भात स्वतः हंसराज अहिर यांनी सर्वच व्यासपीठांवरून जाहीर नाराजी व्यक्त केलेली होती. आणि पक्षातील नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी आत्मचिंतन करावे असेही त्यांनी महायुतीच्या महामेळाव्याच्या भाषणात स्टेजवरच आपले मत केले होते . त्यामुळे आता मुनगंटीवारच्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये पक्षांतर्गत कलह उफाळून येईल का ? आणि ओबीसींचा विरोध होईल का ? वणी , आर्णी , जिवती , कोरपना , गोंडपिपरी या भागामध्ये जिथे हंसराज अहिर यांचे समर्थक प्रचंड संख्येने आहेत तिथून सुधीर मुनगंटीवार यांना मते पडतील का ? ओबीसी समाजाची साथ अल्पसंख्यांक असलेल्या आर्य वैश्य समाजाला मिळेल का ? की पुन्हा एकदा जातीच राजकारण होऊन ओबीसी समाज एक झाल्यास पुढे काय ? असे प्रश्नवजा आव्हान पार करत मुनगंटीवार यांना या निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. राष्ट्रीय पातळीवरील ही निवडणूक असल्याने देशात मोदींचे हात बळकट करण्यासाठी कामांमध्ये अग्रगण्य असणारा , विकास कामासाठी कायम समोर राहणारे मुनगंटीवार यांना चंद्रपूर वणी आर्णी लोकसभा निवडणुकीत लोक विकासाच्या नावावर मत देतील की पुन्हा एकदा 2019 च्या निवडणुकी प्रमाणे जातीय राजकारण होऊन त्याचा फटका जसा हंसराज अहिर यांना बसला तसाच फटका मुनगंटीवार यांना बसेल ? या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच देईल . लोकसभेची उमेदवारी जाहीर झाल्याने मुनगंटीवार यांचे काष्ठ पूजन फळाला आले हे मात्र निश्चित. विजयाच्या दिशेने ते वाटचाल करतीलच. तोवर मुनगंटीवार यांना आधुनिक केसरी परिवारातर्फे मनःपूर्वक शुभेच्छा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# पुढचा आमदार आम्ही ठरवणार : दिलीप कानगुडे

आधुनिक केसरी न्यूज

**सुभाष माळवे**

**कर्जत :** दोन्ही आमदारांनी पोरचेष्ठा चालवली असल्याने पुढचा आमदार कोण हे आम्ही ठरविणार असे स्वाभीमानी सकल मराठा बहुजन विचार मंचाचे समन्वयक इंजी दिलीप कानगुडे यांनी कर्जत येथील एका हॉटेल मध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

स्वाभीमानी सकल मराठा बहुजन विचार मंचाचे पदाधिकारी यांच्या सह दिलीप कानगुडे यांनी ही पत्रकार परिषद घेतली या पत्रकार परिषदेत बोलताना कानगुडे पुढे म्हणाले की, मराठा सेवा संघ जिल्हा अध्यक्ष व अनेक पदांवर काम केले स्वयंभू स्थान निर्माण करावे या उद्देशाने व बाहेर फिरत असताना आलेल्या अनुभव यावर काम करण्यासाठी प्रेरणा



घेऊन पुढील काळात तालुक्यासाठी काम करायचे आहे. कुकडीचे पाणी आले पण पाणी मिळाले का हे कोणी बघत नाही गरजवंत ला पाणी मिळाले नाही एसटी डेपो करणे अवघड आहे का पण राजकीय पोरचेष्ठा चालवली जाते तालुक्यात अधिकारी येण्याची शक्यता नाही पंचड दबावाखाली आहेत. भावा भावात बापलेकात वाद वाढविले जातात याला हे दोन्ही आमदार जबाबदार आहेत. यांनी हजारो घरे फोडली आहेत. संभाजी ब्रिगेड व सेवा संघ वेगळ्या विचाराच्या दावणीला बांधली दोन्ही सांगतात की पुढचा आमदार मीच तिसरा आहे का नाही यासाठी संघटना तयार केली. प्रत्येक गावात ३५ कुटुबे जोडणार पुढचा आमदार आम्ही ठरविणार कोण आमदार होतो ते आम्ही पाहू तालुक्याचा स्वाभिमान पुन्हा मिळवू व्हॉटसअप वर नुसते राजकारण चालू आहे याने विकास होतो का असा सवाल उपस्थित करत कानगुडे पुढे म्हणाले की कृषी, आरोग्य , रोजगार, लाईट व पाणी या मुलभूत व पायाभूत सुविधा वर काम करून जनतेला न्याय देण्यासाठी स्वतंत्र दबाव गट निर्माण करून काम करू असे म्हणत जनतेत जावून काम उभे करण्यात येईल. कानगुडे पुढे म्हणाले की, जनतेला न्याय देण्यासाठी मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली काम करणार असून निवडणूकीत ५० उमेदवार उभे करणार असून महिला व तरूणांचे संघटन वाढविण्यावर भर देणार आहेत. तालुक्यात ९८ पाणी योजना झाल्या पण जनतेला पाणी मिळाले का ४० योजना पूर्ण आहेत पण उदघाटना अभावी सुरू नाहीत ही शोकांतिका आहे याला जबाबदार कोण एवढेच नव्हे तर तालुक्यात २५ कोटी रुपयांची कामे चालू असून ही कामे बेकायदेशीर चालू असल्याचा आरोप करत कानगुडे म्हणाले की, या पुढे चुकीचे कामे यापुढे चालू देणार नाही असा इशारा ही यावेळी कानगुडे यांनी दिला.

कर्जत तालुक्यात सध्या सुरू असलेल्या नरेगा योजनेत मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला असून मोठ्या प्रमाणात विहीरी, गाय गोटा व वैयक्तिक लाभाच्या योजनांची चौकशी झाली पाहिजे.



# प्रा. सुरेश पुरी यांना 'जीवनगौरव' पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा कार्य विद्यापीठाचे सामाजिक महाविद्यालय व माजी विद्यार्थी संघटना यांच्याद्वारे आयोजित "स्मृतीसंगम २०२४" या कार्यक्रमात समाजकार्य महाविद्यालयाचे संस्थापक प्रा. सुरेश पुरी यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. प्र-कुलगुरू वाल्मीक सरवदे यांच्या हस्ते प्रा. पुरी यांना रविवारी हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. विधी विभागातील सभागृहात हा सोहळा झाला. समाजकार्यचे प्राचार्य डॉ. पी. एम. शहापूरकर, प्रा. रमेश गावित, माजी प्राचार्य धनंजय कांबळे, प्रा. राम बाहेती, प्रा. नीलिमा पांडे, प्रा. युसुफ बेन्नुर, प्रा. हेमलता कुलकर्णी, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष गणेश मते, उपाध्यक्ष शेख खय्युम आदी उपस्थित होते.

# टिप्परच्या धडकेत शेख सिराज यांच्या मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** अजीसपुर येथील शेख



सिराज शेख अय्युब वय 30 वर्ष पवित्र रमजान महिना सुरूअसताना सेहरी करून नमाज पठण करून सकाळी सहा वाजता आपल्या मित्रांसोबत क्रिकेट खेळण्यासाठी आपल्या मोटरसायकल क्रमांक एम एच17 BC9210 हिरो होंडा गाडीने लोणार फाट्याकडे येत असताना अवैध रेती टिप्पर भरधाव वेगाने समोरून येणारे शेख शिराज याला जबरदस्त धडक दिली यात शेख सिराज शेख आयुब गंभीर जखमी झाले याची माहिती गावकऱ्यांना मिळतास उपचारासाठी मेहकर येथे नेत असताना रस्त्यात मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच सकाळी सहा वाजेपासून ते दुपारी अडीच वाजेपर्यंत लोणार ते मंठा रोड वर चक्काजाम केला. शेख सिराज हा अजिस्पुर ग्रामपंचायत मध्ये आपरेटर म्हणून काम करत होता त्याच्या पश्चात एक तीन वर्षाचा मुलगा, व दुसरा मुलगा तीन महिन्याचा आहे. सकाळी सहा ते दुपारी अडीच वाजेपर्यंत गावकऱ्यांच्या वतीने रस्ता रोको केला यात कोणत्याही प्रकारची विपरीत दुर्घटना घडली नाही. गावकऱ्यांनी शाळेतून जाणाऱ्यांना विद्यार्थ्यांना, अत्यावश्यक असणाऱ्यांना, तसेच ॲम्बुलन्स, यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ दिला नाही.

या घटनेची पोलीस स्टेशनला माहिती मिळताच पोलीस स्टेशनचे ठाणेदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच तहसीलचे तहसीलदार व महसूलचे कर्मचारी घटनास्थळी होते. महसूल विभाग व पोलीस विभागावर जनतेचा रोष

अवैध रेती तस्करी करणाऱे जवळ पास 20ते 25टिप्परवर नंबर प्लेट नसतात तरीपण संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करत नाही वाळु माफिया व तहसीलदार यांच्यात साठे लोटे असल्याचे दिसून येत आहे. महसूल विभागाचा दुर्लक्ष मुळे या दहा दिवसात हा तिसरी घटना असून याकडे महसूल विभाग व पोलीस विभाग दुर्लक्ष करत आहे या वाळू माफिया वर व महसूल विभागाचे दोषी अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी जनतेकडून मागणी करण्यात येत आहे. ग्राम अजीजपुर येथील सर्व समाजातील बांधवांनी रस्ता रोको केला. सकाळी सहा वाजेपासून भर उन्हामध्ये लहान मुलापासून ते 65 वर्षापर्यंत म्हाताऱ्या पर्यंत उपस्थित होते व दुखःत भावना व्यक्त करत होते या घटनेमुळे अजिसपूर गावासीयावरशोककळा पसरली आहे.

# चाळीस लाखांची थकबाकी न भरल्याने ग्रामपंचायतने ठोकले सबस्टेशनला टाळे

आधुनिक केसरी न्यूज

**नेवासा :** दोन वर्षांपासून थकलेली एकूण चाळीस लाखाची कराची थकबाकी न भरल्याने नेवासा बुद्रुक ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने नेवासा बुद्रुक येथे असलेल्या सबस्टेशनला गुरुवारी दि.१४ मार्च रोजी सकाळ ११ च्या सुमारास टाळे ठोकण्यात आले. ग्रामपंचायत व ग्रामस्थ महिलांनी केलेल्या अभिनव आंदोलनाने सर्वांचेच लक्ष वेधले. महापारेषणचे कार्यकारी अभियंता दीपक पाटील यांनी दिलेल्या लेखी आश्वासनंतर ठिय्या आंदोलन स्थगित करण्यात आले. महापारेषण १३२ के व्ही सबस्टेशन च्या प्रांगणात झालेल्या या आंदोलनाचे नेवासा बुद्रुक ग्रामपंचायतचे मार्गदर्शक प्रकाश सोनटक्के,माजी सरपंच अण्णाभाऊ पेचे,उपसरपंच बाळासाहेब जायगुडे,माजी उपसरपंच सचिन धोंगडे, भानुदास रेडे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले.१३२ के व्ही सबस्टेशनला टाळे ठोकण्यापूर्वी प्रकाश सोनटक्के,उपसरपंच बाळासाहेब जायगुडे,सचिन धोंगडे यांनी येथील कर्मचाऱ्यांशी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून असलेल्या थकबाकी बाबत रोखठोक भूमिका मांडली. यावेळी बोलताना ग्रामपंचायतचे मार्गदर्शक प्रकाश सोनटक्के म्हणाले की नेवासा बुद्रुक येथील जागेवर १३२ के व्ही सबस्टेशनकडे सन २०२२/२३ रुपये वीस लाख व सन २०२३/२४ चा कर वीस लाख असा एकूण चाळीस लाखाची कर बाकी असून तो अद्याप ही भरलेला नाही, या संदर्भात गटविकास अधिकारी नेवासा पंचायत समिती यांच्याकडे कार्यकारी अभियंता यांनी अपील केले होते याबाबत गटविकास अधिकाऱ्यांनी नेवासा बुद्रुक ग्रामपंचायतच्या बाजूने निकाल दिला होता. याबाबत काहीही ठोस कारवाई महा पारेषणच्या अधिकाऱ्यांनी केली नाही मात्र ग्रामपंचायतकडे एक ते दीड लाखाच्या थकबाकीबाबत त्यांनी कारवाई करून गावास वेठीस धरण्याचे काम केले.महापारेषण कडून ग्रामपंचायतला



चाळीस लाख रकमेचा भरणा केल्यास आम्ही देखील आमची बाकी त्वरित भरू शकतो असे सांगितले. मात्र गावातील कनेक्शन कट करून कारवाई केल्याच्या निषेधार्थ आम्ही महा पारेषणच्या १३२ के व्ही च्या सबस्टेशनला टाळे ठोकून ठिय्या आंदोलन करत आहे आम्हाला याबाबत चाळीस लाख थकबाकी भरणा करण्याबाबतचे लेखी उत्तर आल्याशिवाय आम्ही माघार घेणार नाही असे स्पष्ट केले.टाळे(सील) ठोकण्याबाबतचे दि.१३ मार्च २०२४ च्या निवेदन आम्ही कार्यकारी अभियंता अतिउच्च दाब संरक्षण व सुरक्षा विभागाला दिले असल्याचे प्रकाश सोनटक्के यांनी यावेळी बोलताना सांगितले. गुरुवारी दि.१४ मार्च २०२४ रोजी सकाळी ११ वाजता याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी भ्रमणध्वनीवरून चर्चा केली मात्र त्यांचे लेखी येत नाही तोपर्यंत आम्ही येथून हलणार नाही असे सांगत सबस्टेशनला टाळे (सील)ठोकण्यात येऊन सबस्टेशनच्या प्रांगणातच ठिय्या मांडण्यात आला.

यावेळी झालेल्या ठिय्या आंदोलनात ग्रामपंचायतचे मार्गदर्शक प्रकाश सोनटक्के,उपसरपंच बाळासाहेब जायगुडे,माजी उपसरपंच भानुदास रेडे,माजी सरपंच अण्णाभाऊ पेचे,सचिन धोंगडे,पोलीस पाटील दिलीप गायकवाड,राजेंद्र मारकळी,चेअरमन राजेंद्र यादव, शिवा साप्ते,अनिल चांदणे,अक्षय वडागळे,अनिता बोरुडे, लंका चांदणे,बाळू शिंदे,अंकुश बडे,रितेश गायकवाड, आदेश चांदणे, चंदा चांदणे,मंगल चांदणे,रुपाली चांदणे, शालिनी चांदणे, स्वाती चांदणे,सुरेखा गायकवाड, लंका वडागळे,सुनीता कणगरे,अनिता कणगरे,राऊबाई कनगरे, शीतल चांदणे यांच्यासह यांच्यासह गावातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. कार्यकारी अभियंता दीपक पाटील यांनी सदरची रक्कम पंधरा दिवसात धनादेशाद्वारे देण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्यानंतर एक तासाने महापारेषणचे कार्यालय खुले करण्यात आले त्यामुळे आंदोलन स्थगित करण्यात आले.

# ३० कोटींतून ऐतिहासिक रामाळा तलाव होणार पुनरुज्जीवित : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

चंद्रपूर : ऐतिहासिक रामाळा तलावाच्या सुंदरतेला प्रदूषणाचे ग्रहण लागले होते. त्यामुळे या तलावाचे संवर्धन करण्यात यावे अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केली होती. याची दखल मुख्यमंत्री यांनी घेतली असून सदर कामाकरिता अमृत 2.0 योजनेअंतर्गत 30 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे आता ३० कोटी रुपयातून ऐतिहासीक रामाळा तलाव पुनरज्जीवित होणार आहे.

आ. किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नातून चंद्रपूर मतदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी उपलब्ध केल्या जात आहे. नुकतेच आमदार किशोर जोरगेवार व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते 150 कोटी रुपयांच्या 192 विकासकामांचे भुमिपूजन करण्यात आले आहे. तर मतदार संघाच्या सर्वसमावेशक विकासासाठी त्यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. चंद्रपूर शहराच्या मध्यभागी असलेल्या रामाळा तलावाचे संवर्धन करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी ही आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. सदर मागणीचा त्यांच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अखेर त्यांच्या मागणीला यश आले आहे. नगर विकास विभागाच्या वतीने सदर विकासकामासाठी 30 कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या प्रकल्पात मलनिस्सारण प्रकल्प, सौंदर्यीकरण, रिटेलिंग वॉल, संरक्षण भिंत, जलीय तण काढणी यंत्रणा यासह इतर सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. त्यामुळे या तलावाचे संवर्धन होणार असून यातून शहराच्या पर्यटनात, रोजगारात वाढ होणार असून सौंदर्यात भर पडणार आहे. रामाळा तलाव हा चंद्रपूर शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठेवा आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या तलावाकडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे तलाव प्रदूषित झाला होता आणि त्याचे सौंदर्य नष्ट होत होते. या तलावाचे संवर्धन



करण्यासाठी आपण सतत प्रयत्न करत होतो. आता अमृत २.० योजनेंतर्गत यासाठी ३० कोटी रुपये मंजूर झाले आहेत. यातून रामाळा तलाव पुन्हा एकदा चंद्रपूर शहराचे सौंदर्य वाढवणारा ठरेल असे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. रामाळा तलावाच्या संवर्धनासासाठी 30 कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल रामाळा तलाव संरक्षण समीतिच्या पदाधिका-यांनी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी भेट घेत त्यांचे आभार मानले आहे. यावेळी डॉ. सुशील मुंधडा, जुगल सोमानी, सिए. दामोदर सारडा, मनोज जुनोनकर, मुंकुद गांधी, सुधिर बजाज, उमेश चांडक, ओमप्रकाश सारडा, श्याम धोपटे, राजु नागरकर, सोनी, मदन पांडिया, विलास वानखेडे, माखीजा, इंगोले, रमेश बोथरा, श्रीचंद हासानी आदींची उपस्थिती होती. यावेळी रामाळा तलाव संरक्षण समितीच्या पदाधिका-यांनी रामाळा तलावाच्या संवर्धनाबाबत जोरगेवार यांच्याशी चर्चा केली. सदर तलाव हा चंद्रपूरच्या सौंदर्यात भर घालणारा आहे. मात्र अनेक नाल्यांचे पाणी तलावत येत असल्याने तलाव दुषित झाला आहे. यावरही उपाययोजना केल्या जाणार आहे. आपण या तलावाच्या संवर्धनासाठी प्रयत्न करत आहात. मंजूर करण्यात आलेल्या 30 कोटी रुपयातून या तलावाला पुनरुज्जीवन मिळणार आहे.

# नांदेड लोकसभेचा उमेदवार विक्रमी मतांनी विजयी होणार

## शिवराज पाटील गाडीवान जिल्हा प्रवक्ता : धर्माबाद शहरात फटाके फोडून आनंदोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** भारतीय जनता पक्षाची काल सायंकाळी लोकसभेच्या उमेदवारीची दुसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली या यादीमध्ये नांदेड लोकसभेसाठी विद्यमान खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे ही बातमी प्रसारमाध्यमावरून समजतात धर्माबाद तालुक्यातील भारतीय जनता पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या महायुतीच्या सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी पानसरे चौकात जमा होऊन फटाक्यांची आतिषबाजी करून बँड च्या तालावर ठेका धरला खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांना उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चितच होते परंतु मध्यंतरीच्या कालावधीमध्ये डॉक्टर मीनल खतगावकर यांनी देशाचे गृहमंत्री अमित भाई शहा यांची भेट घेतल्याने अनेक चर्चेला उधाण आले होते परंतु भारतीय जनता पक्षात एकनिष्ठतेने काम करणाऱ्या व पक्षाला पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील लोकांपर्यंत तन्मयतेने आणि निष्ठेने पोहोचवण्यामध्ये गत पाच वर्षांमध्ये खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर हे भारतीय जनता पक्षाच्या सर्व परीक्षेला उत्तीर्ण ठरले आहेत खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जनता दरबार हा मुख्य जनसामान्य कार्यकर्त्यांचे प्रश्न सोडवण्याचा स्रोत होता खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी पाच वर्षात केंद्र शासनाच्या विविध योजना कोठेवधी रुपयाचा निधी नांदेडच्या विकासासाठी आणला नांदेड जिल्ह्यात झपाट्याने अत्यंत कार्यक्षमता व कुशल संघटक असलेला पहिलाच खासदार भारतीय जनता पक्षाच्या रूपाने खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या रूपाने पक्षाला मिळाला होता पक्षाने दिलेल्या



संधीचं सोनं करत खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड जिल्ह्यातील जवळपास साडेसहाशे गावांमध्ये आपल्या भारतीय जनता पक्षाच्या विचारांची पेरणी करत देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या भारत विकसित भारताच्या संकल्पनेला साथ देत सर्व योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणाने ग्रामीण भागातून सुद्धा करून घेतली होती प्रशासनावर पकड असलेला व जन्म जनसामान्याच्या गळ्यातील ताईत असलेल्या खासदार पथराव पाटील चिखलीकर यांच्या उमेदवारीने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झालेले आहे निश्चितच नांदेड जिल्ह्यातील ही भारतीय जनता पक्षाची जागा विश्वविक्रमी मताने निवडून येईल यामध्ये कुठलेही दुमत नाही असे भाष्य यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा प्रवक्ते शिवराज पाटील गाडीवान यांनी केले यावेळी धर्माबाद तालुक्यातील महायुतीचे अनेक कार्यकर्ते या आनंदोत्सवामध्ये पानसरे चौकात सामील झाले होते यामध्ये अशोक पाटील वडजे, सनित शकरवार ,कृष्णा तीमापुरे, बाबू गंदलवार अमित मुंदडा साईनाथ स्वामी रोशनगावकर, नाना सिंग धिल्लो,सज्जन गडोड ,गणेश पाटील राजापूरकर ,सतीश पाटील शिंदे, तुकाराम पाटील महागवळी, राजू जल्लोड ,रमेश मिनकीकर, रवी श्रीरामे, ललेश पाटील मंगनाळीकर, चैतन्य घाटे, शंकर तुंगणेवार लक्ष्मण वडनावार, पुंडलिक समसते पाटील आदी भारतीय जनता पक्षाची कार्यकर्ते उपस्थित होते.



# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्काराने राजुभाऊ येले सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांशी बांधिलकी राखत मातंग समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाकरिता सातत्याने प्रयत्नरत असलेले भाजपाचे ज्येष्ठ पदाधिकारी राजुभाऊ येले यांना दि. १२ मार्च, २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने सन २०१९-२० चा साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील नॅशनल सेंटर फॉर फार्मसी, आर्ट्स ॲन्ड सायन्स (NCPA) जमशेद टाटा नाट्यसभागृहात आयोजित या पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे प्रमुख पाहुणे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, क्रीडा व सांस्कृतिक मंत्री संजय बन्सोडे, माजी सामाजिक न्याय मंत्री संजय सावकारे, चंद्रपूर चे आमदार किशोर जोरगेवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे, समाज कल्याण आयुक्त पुणे ओमप्रकाश बकोरीया आदींच्या उपस्थितीत शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम देवून श्री येले यांना सन्मानित करण्यात आले. त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्यानंतर विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात आले व त्यांना पुढील यशस्वीतेकरीता शुभेच्छा देण्यात आल्या.

# अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड घोषित

## जेठे, जगताप यांची संभाजीनगर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष तथा सर्वेसर्वा प्रदीप बाबा खंडापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा विभागीय अध्यक्ष दादासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली संभाजीनगर येथे १३ मार्च रोज बुधवार रोजी पार पडली यावेळी विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या घोषित करण्यात आल्या. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीची बैठक राष्ट्रीय अध्यक्ष तथा सर्वेसर्वा प्रदीप बाबा खंडापूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत व अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा विभागीय अध्यक्ष दादासाहेब काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीसाठी अनेक पदाधिकारी यांची उपस्थिती होती . यावेळी अनेक महत्त्वाचे ठराव यावेळी घेण्यात आले व अनेक पदाधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यात आल्या यावेळी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात तीन जिल्हा अध्यक्ष नेमण्याचा ठराव घेण्यात आला यात सिल्लोड सोयगाव फुलंब्री आणि छत्रपती संभाजी नगर यासाठी एक वैजापूर गंगापूर पैठण यासाठी एक तर कन्नड खुलताबाद आणि छत्रपती संभाजी नगर यासाठी एक असे तीन जिल्हाध्यक्ष नेमण्याचे ठरले तरी इतर पदाधिकाऱ्यांच्या निवडी व तालुकाध्यक्ष तालुका कार्यकारणी लवकर जाहीर करण्यात येईल असे ठरले .यावेळी संघटनेच्या फादर बॉडी सह महिला आघाडी , युवा आघाडी , किसान आघाडी व व्यापारी आघाडी यांच्याही निवडी करण्याचे यावेळी ठरले . यात यावेळी काही पदांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या यात मराठवाडा विभागीय ( प्रसिद्धीप्रमुख )मीडिया प्रमुख म्हणून पत्रकार कपिल जयस्वाल यांची निवड करण्यात आली :तर सोयगाव सिल्लोड फुलंब्री संभाजीनगर या विभागासाठी प्रदीप संतोष जगताप यांची जिल्हाध्यक्ष निवड करण्यात आली .तसेच संभाजीनगर , खुलताबाद , कन्नड या विभागासाठी - जिल्हध्यपदी पत्रकार सुधाकर जेठे यांची निवड करण्यात आली .संभाजीनगर महानगर महिला आघाडीच्या प्रमुख पदी श्रीमती मनीषा मानकर यांची आणि महिला आघाडीच्या संभाजीनगर पश्चिम विभागाच्या जिल्हाध्यक्ष पदी अनुजा सदार यांची निवड करण्यात आली . संभाजीनगर जिल्हा संघटक सुनील वैद्य व संभाजीनगर जिल्हा सरचिटणीस म्हणून संदीप मानकर तर सिल्लोड तालुका अध्यक्ष म्हणून गजानन काळे यांची यावेळी निवड करण्यात आली . भोकरदन तालुका सरचिटणीस पदी भरत मानकर यांची निवड करण्यात आली .यावेळी कार्यकारणीचे पदे व त्याचा आराखडा पटलावर ठेवून मंजूर करण्यात आला यावेळी निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे राष्ट्रीय अध्यक्षांच्या हस्ते सत्कार करण्यात आला याप्रसंगी संभाजीनगर शहरात लवकरच विभागिय मेळावा घेण्याचा ठराव यावेळी मंजूर करण्यात आला आभार प्रदर्शन प्रदीप जगताप यांनी व्यक्त केले व राष्ट्रगीता नंतर बैठकीची सांगता झाली . लवकरच तालुका - जिल्हा स्तरावर पदाधिकारी नियुक्ता करण्यात येणार असून सदर संघटनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी जिल्हाध्यक्ष तथा मराठवाडा विभागिय अध्यक्ष यांना संपर्क करावा असे आवाहन संघटने तर्फे करण्यात आले आहे.



# रावेर मतदारसंघात भाजपंतर्गत धुसफूस

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** सर्वच राजकीय पक्षांकडून लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या याद्या जाहीर केल्या जात असून, भाजपने बुधवारी रावेर मतदारसंघात खासदार रक्षा खडसे यांना तिसऱ्यांदा उमेदवारी घोषित केल्याने रावेरसह यावल तालुक्यात उमेदवारीसाठी इच्छुक अमोल जावळे समर्थक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करुन आपापल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. भाजपकडून लोकसभेच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली. त्यात राज्यातील २० उमेदवार घोषित करण्यात आले. जिल्ह्यातील जळगाव व रावेर येथील जागांचे उमेदवार जाहीर केले.त्यात रावेरसाठी खासदार रक्षा खडसे आणि जळगावसाठी माजी आ. स्मिता वाघ यांचे नाव जाहीर केले.

# समाजासाठी कार्य करणारे नेतृत्व तयार होणे गरजेचे : प्र. कुलगुरु डॉ. श्रीराम कावळे

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** आदिवासी संस्कृती व जीवनपद्धती जगातील प्राचीन संस्कृती असुन सर्वांसाठी गौरवाची बाब आहे. पुस्तकी ज्ञानाच्या सोबतीला अनुभवातील ज्ञानाची जोड असणे हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगींण विकासाकरीता उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात गेल्यास समाज व राष्ट्राप्रती असलेली जबाबदारी व जाणीव असणे आवश्यक आहे. आधुनिकीकरणाच्या काळात विद्यार्थी व समाज यामधील दुरावा दुर करणे या कार्यक्रमाच्या माध्यमातून साध्य होईल असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ.श्रीराम कावळे यानी केले. गोंडवाना विद्यापीठाच्या इंग्रजी पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व आदिवासी अध्यासन केंद्राद्वारे आयोजित 'अभ्यास भेट 'अनुभूती' आदिवासी जीवन व संस्कृती या विषयावर लेखा-मेंढा येथे एक दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ते उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, प्रमुख मार्गदर्शक डॉ.कुंदन दुपारे, डॉ. देवाजी तोफा व सरपंच नंदाताई दुग्गा उपस्थित होते. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना आदिवासी जीवनशैली आणि संस्कृतीचा सखोल अनुभव घेण्याची संधी देणे व त्यांचे समाजाप्रती असलेले दायित्व या विषयी जाणीव करून घेणे हा आहे. डॉ. कुंदन दुपारे यांनी आदिवासी समाजामध्ये असलेले जैवविविधतेचे महत्व समजावून सांगितले. तसेच प्रात्यक्षिकाद्वारे बांबू व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यात आले. आदिवासी समाजाकडे असलेला जैवविविधतेचा ठेवा जतन करुन त्या समोरील आव्हाने यासंदर्भात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. बांबू प्रशिक्षणावर पार पडलेल्या सत्रातून विद्यार्थ्यांना आदिवासी परंपरा तसेच शाश्वत पद्धतींची माहिती मिळाली. डॉ. देवाजी तोफा यांनी मेंढालेखा ग्रामसभा अधिकार मिळवण्याची पार्श्वभूमी समजावुन सांगताना विद्यार्थ्यांनी संशोधनातून आदिवासी जीवन व संस्कृतीबद्दल असलेले गैरसमज दुर करून गौरवशाली आदिवासी संस्कृती व जीवन पद्धतीचा इतिहास जगासमोर आणण्याची जबाबदारी घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी निवडणूक जागरूकता, व्यसनमुक्ती आणि आदिवासी अभ्यासाच्या महत्वपूर्ण मुद्द्यावर पथनाट्य सादर केले. अनुभूती हे एक अशा प्रकारचे व्यासपीठ आहे, जे आदिवासी समुदायाचा सांस्कृतीक वारसा आणि त्यांच्यासमोर येणाऱ्या आव्हानांशी जोडून घेते. असे आदिवासी अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. वैभव मसराम यांनी म्हटले. तसेच विद्यार्थ्यांना भारतीय समाजाची विविधरंगी माहिती देऊन त्यांच्यात आदर, सहानुभूती आणि कळकळ ही मूल्ये रुजविल्या जातात, जी राष्ट्रीय एकात्मतेसाठी अत्यावश्यक आहेत. असे डॉ. विवेक जोशी यांनी सांगितले. यावेळी विद्यापीठ तसेच स्थानिक समुदायातील सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. डॉ. शिल्पा आठवले, डॉ. प्रमोद जावरे, सहा. प्राध्यापक अतुल गावस्कर यांनी योगदान दिले.

याप्रसंगी आदिवासी संस्कृतीचे विविध सादरीकरण करणाऱ्या कार्यक्रमातून सामाजिक जाणीव आणि सांस्कृतीक संवेदनशीलता वाढविण्याची प्रतिबद्धता दिसून आली. कार्यक्रमाचे संचालन प्रबोधी वेस्काडे यांनी तर आभार आलिशा गजभिये यांनी मानले.

# संत एकनाथ गॅस एजन्सीकडून कमी वजनाचे सिलिंडर देऊन ग्राहकांची लूट

## एजन्सी तत्काळ बंद करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील इंडियन ऑईल कंपनीची संत एकनाथ गॅस एजन्सी कमी वजनाचे सिलेंडर देऊन ग्राहकांची कोटयावधी रूपयांची केलेली लुट वसूल करून सदरील एजन्सी तात्काळ बंद करणे या बाबत  कल्याण गोविंदराव मगरे , शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपशहर प्रमुख पैठण यांनी  केली असता पुरवठा आधिकार्यांनी पाहणी करून कमी वजनाचे गँस सिलेंडर आढळून आले असता , पैठण येथील इंडियन ऑईल कंपनीची संत एकनाथ गॅस एजन्सी कमी वजनाचे सिलेंडर देऊन ग्राहकांची कोटयावधी रूपयांची केलेली लुट वसूल करून सदरील एजन्सी तात्काळ बंद करणे बाबत तक्रारदार यांचे दिनांक 11 मार्च  रोजी सायंकाळी या कार्यालयास दुरध्वनी संदेशान्वये प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने नायब तहसिलदार ( पुरवठा ) , अव्वल कारकुन ( प्रशासन ) यांनी दिनांक ११  रोजी सायंकाळी सदरील गॅस एजन्सी गोडावून मध्ये



जावून स्थळपाहणी / पंचनामा केलेला आहे . सदर पंचनामामध्ये नमुद आहे की , मे . संत एकनाथ गॅस सर्व्हिसेस पैठण वितरक , सौ . मिरा धनंजय कोरे , इंडियन ऑईल गॅस एजन्सी गोडाऊन पैठण येथे हजर झालो असता तक्रारदार आनंद साहेबराव बनकर व कल्याण गोविंदराव मगरे व इतर यांनी आज सायंकाळी ६.३८ मी . वाजता केलेल्या दुरध्वनी संदेशानुसार तहसिलदार पैठण यांच्या तोंडी आदेशान्वये नायब तहसिलदार पुरवठा , अव्वल कारकुन प्रशासन सदर गोडाऊन येथे हजर झालो असता , गॅसव्दारपोहच वाहन क्रमांक MH 20 EL 2759 सदर वाहन मधून गोडाऊन मध्ये उतरत असंताना सदर अंदाजे ७ ते ८ सिलेंडर इलेक्ट्रॉनिक वजन माप काटयावर मोजमाप केले असता सदर सिलेंडरचे वजन 21.600 , 22.300 , 25.900 , 29.200 , 16.00 , 22.400 , 24.00 अश्या प्रमाणे सदर घरगुती सिलेंडरचे वजन आढळुन आले . सदर तक्रारदार हे गोदाममधून विक्री व्दारे सिलेंडर घेत असतांना सदर सिलेंडर हे 21.600 वजन भरलेले असल्याचे निदर्शनास आले असल्याबाबत पंचनामामध्ये नमुद आहे . सदर पंचनामावर तक्रारदारसह पंच, गॅस गोडाऊन किपर व नायब तहसिलदार (पुरवठा), अव्वल कारकुन यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.
याबाबत निवेदनावर सह्या करणारे व तक्रारदार आनंद बनकर, कल्याण मगरे, किरण घाटविसावे, विकास नवगिरे, सचिन लिंबोरे यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी संभाजीनगर यांना या पंचनामे अधारे तक्रारी केली असुन पैठण येथील ग्राहकाची लुट करणारी संत एकनाथ गँस एजन्सी तत्काळ बंद करण्याची मागणी केली आहे.

# पळासखेड हाणामारी; २२ जणांवर आरोपपत्र

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील पळासखेड येथे दोन गटात



झालेल्या हाणामारीत २२ जणांवर आरोपपत्र दाखल मुलीस पळवून नेवून लग्न केल्याचे कारणावरून दोन गटात सोमवार दिनांक. ११/३/२४  मार्च रोजी सकाळी वाद झाला दोन्ही गटात शिवीगाळीच रुपांतर हाणामारीत झाले हाणामारीत मुलीचे वडील ज्ञानेश्वर नाना उघडे यांचे हाणामारीत डोक्याला जादा मार लागल्याने त्यांना जळगाव जिल्हा रुग्णालयात येथे दाखल केले आहे व फर्दापूर पोलीस ठाणे अंतर्गत परस्परविरोधी तक्रार दाखल करण्यात आले आहेत. एका गटाचे आरोपी राहुल संतोष सोनवणे, नितीन सोनवणे, पवन सोनवणे, संजय दत्तु सोनवणे, दत्तु धना सोनवणे, संतोष धना सोनवणे, प्रकाश काशिनाथ काळे, कौशल्याबाई सोनवणे, प्रमिलाबाई दत्तू सोनवणे, सरिता संजय सोनवणे उषा प्रकाश काळे व दुसऱ्या गटातील आरोपी ज्ञानेश्वर नाना उघडे, राजू नाना उघडे, रंजना उघडे, पूजा ज्ञानेश्वर उघडे, लक्ष्मी न्यानेश्वर उघडे, संतोष गर्दै, उमेश संतोष गर्दै, मंगलाबाई संतोष गर्दै, राणी संतोष गर्दै, गोकुळ शिवाजी सुपनार, रुपाली गोकुळ सुपनर, सुमनबाई नाना उघडे सर्व राहणार पळासखेड तालुका सोयगाव यांच्यावर फर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रफुल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सुग्रीव चाटे कर्मचारी निलेश लोखंडे,मिरखा तडवी इत्यादी कर्मचारी हे तपास करीत आहे.

# फर्दापूर येथे समुपदेशन केंद्राच्या वतीने कायदेविषयक शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने  महिला समुपदेशन केंद्र सिल्लोड पोलिस स्टेशन ( शहर)  व अभय केंद्र सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व मुलींना कायदेविषयक जाणीवजागृती निमित्त मार्गदर्शन व कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रम प्रमुख पाहुणे म्हणून संरक्षण अधिकारी श्री. आबाराव कळम सर यांची उपस्थिती होती.  कार्यक्रमाची सुरवात मातोश्री रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला समुपदेशन केंद्राचे समुपदेशन विशाल पाईकराव यांनी केले. विशाल पाईकराव यांनी महिला समुपदेशन केंद्र कश्या पद्धतीने कार्य करते. महिलांचे प्रश्न कश्या प्रकारे सोडवले जातात या विषयी  सखोल अशी माहिती सांगितली. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कळम सर यांनी महिला व बाल विकास योजने अंतर्गत चालणाऱ्या 0 ते 18 वर्ष वयोगटातील मुलांसाठी विविध योजना राबवल्या जातात त्या विषयी माहिती सांगितली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था चे प्रकल्प अधिकारी उमाकांत बोर्ड सर यांनी मुलींच्या शिक्षणासाठी बार्टी, टार्टी, सारथी यासारख्या संस्था कार्यरत आहे व त्याच्या फायदा कसा करून घेता येईल.
या विषयी सांगितले. महिला समुपदेशन केंद्राच्या समुपदेशक आरती जाधव यांनी यांनी मनोगत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जैन यांनी केले तर उपस्थित मान्यवर महिलांचे आभार श्री बारी सर यांनी मानले.     यावेळी गावातील महिलांचा सहभाग यामध्ये दिसून आला. बार्टी चे समतादुत मनोहर अपार, उमाकांत बोर्ड. बारी सर, महिला समुपदेशक केंद्राचे समुपदेशक विशाल पाईकराव व आरती जाधव , राहुल जैन गावातील प्रतिष्ठित मंडळी यांची यावेळी उपस्थिती होती. बचत गटाच्या सी आर पी सुनीता बनकर व मनीषा भीमराव बोराडे यांनी या कार्यशाळेसाठी परिश्रम घेतले. उपस्थित सर्व महिलांचा पुष्प देऊन महिला दिनानिमित्त सन्मान करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.





# सतीश लोखंडे यांना समाजभान पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ येथील सामाजिक कार्यकर्ते तथा आम आदमी पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश युवा संघटनमंत्री श्री सतीश देवेंद्र लोखंडे यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची दखल घेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या समाजकार्य शिक्षण विभागाच्या वतीने श्री सतीश लोखंडे यांना समाजभान पुरस्कार  देण्यात आला.
श्री सतीश लोखंडे यांनी शेतकरी, कष्टकरी, विविध वस्तू विक्रेते, होकर्स, तरुण युवक, सुशिक्षित बेरोजगार, शालेय विद्यार्थी, वृध्द महिला, विधवा स्त्रिया यांच्यासाठी केलेल्या कार्याची दखल घेत निवड केली असल्याचे निवड समितीने सांगितले.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर,सामाजिक कार्य विभागाचे प्राचार्य डॉ. परशुराम शहापूरकर, गेब्स फाउंडेशनचे मिलिंद कुलकर्णी, माजी विद्यार्थी संघटनेचे गणेश मते यांच्या हस्ते श्री लोखंडे यांना समाजभान पुरस्कार प्रदान करण्यात आला.
सदरील पुरस्कार मिळाल्याबद्दल कोम्रेड राम बाहेती, डॉ. निलिमा पांडे,डॉ. धनंजय कांबळे,डॉ. युसुफ बेन्नुर,डॉ. रमेश गावीत, मनोज गाडेकर, राजेंद्र जाधव,अमोल सावदेकर, खय्युम सय्यद, सुशील मिसाळ, अमोल खरात, अमोल ढाकणे, बाळासाहेब जाधव, रोहित शिंदे, राम काळे, क्रांतीपाल शिरसाट, सरिता बिडला, कोमल रगडे, किशोर गाढवे, शितल बंडगर (गाढवे),अमोल राठोड, हनुमान रासवे आदींनी अभिनंदन केले.

# रमजान महिन्यांच्या स्वागतासाठी बाजारपेठा सज्ज

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** यावर्षी रमजान महिन्यासाठी सोमवारी दिनांक 11 चंद्र दर्शन झाले. त्यामुळे मंगळवार दिनांक 12 रोजी पासून पहिला रोजास सुरुवात झाली. त्यामुळे रमजान महिन्यांच्या स्वागतासाठी बाजारपेठा सज्ज झालेल्या दिसून येत आहेत. यावर्षी पहिल्या रोजाची 'सहर' पहाटे 5 वाजून 27 मिनिटाला तर 'इफ्तार'  6 वाजून  43 मिनिटांपासून सुरुवात झाली. रमजान महिन्यात पहाटे "सहर" केल्यानंतर संध्याकाळी "ईफ्तार" केला जातो. इफ्तार फळ आहाराने  केला जात असल्याने महिनाभर फळांची मागणी दुप्पट तिप्पट दिसून येते. तसेच शहरातील अनेक भागात फळांची खाद्यपदार्थाची दुकाने लागायला सुरुवात होते. त्यामुळे फळ व्यापारी रमजान मिळण्यासाठी फळाची ऑर्डर देऊन ठेवतात.
रमजान महिन्यात पेंडखजूरला विशेष मागणी असते त्यामुळे रविवारपासून दुकानांमध्ये गर्दी झालेली पाहावयास मिळते.
रमजान महिन्यात महिनाभर खाऊ गल्ली पदार्थांची खाद्यपदार्थांची रेलचेल असते.
छत्रपती शिवाजी चौक ते पोलीस स्टेशन पर्यंत खाद्यपदार्थाची अनेक दुकाने लागतात.
यासोबत पोलीस स्टेशन समोर भागात विशेष दुकाने लागतात .त्या ठिकाणी वेगवेगळ्या खाद्यपदार्थाची दुकाने लागलेली असतात.
रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील प्रत्येक घराघरांमध्ये रंगरंगट व रोषणाई केली जाते.
संपूर्ण महिनाभर ही रंगरंगोटी चालू असते.
रमजान महिन्यात "ईशा" च्या नमाज नंतर विशेष नमाज "तरावीह" अदा केले जाते. या नमाजला विशेष महत्त्व असल्याने जवळपास सर्वच मस्जितीमध्ये नमाज साठी मोठी गर्दी होते. तर अनेक मस्जिद वर आकर्षक रोषणाई केली जाते.



# खामगाव – जालना रेल्वेमार्गावर शिक्कामोर्तब

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** बुलढाणा खामगाव जालना या प्रस्तावित रेल्वे मार्गासाठी



राज्य शासनाने ५० टक्के हिस्सा २४५३ कोटी रुपये देण्यास मान्यता दिली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. यामुळे खामगाव-जालना या रेल्वेमार्गास गती मिळणार आहे. राज्याचा अंतिम अर्थसंकल्प मध्ये खामगाव ते जालना रेल्वे मार्गासाठी राज्य शासन अर्धा हिस्सा उचलणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. खा.प्रतापराव जाधव यांनी खामगाव-जालना प्रकल्प मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लावून धरला होता . खा. जाधव यांनी २००९ पासून प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला. याला मान्यता मिळाली असून राज्य शासन आपला ५० टक्के हिस्सा उचलणार आहे. याबद्धल खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य यांचे आभार मानले आहे.

# पोंभुर्णा येथे विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

## पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यामुळे पोंभुर्णा तालुका विकासात अग्रेसर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील पोंभुर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालय, भुमी अभिलेख कार्यालय आणि दुय्यम निबंधक कार्यालयाचे लोकार्पण तसेच आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृहाच्या भूमिपुजनासह तालुक्यातील आठ पुलांचा पायाभरणी सोहळा राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडला.

कार्यक्रमाला गडचिरोली – चिमूर लोकसभा क्षेत्राचे खासदार अशोक नेते, सा.बा. विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, भुमी अभिलेख विभागाचे जिल्हाअधिक्षक भूषण मोहिते, सह. जिल्हा निबंधक अंकिता तांदळे, नगर पंचायतीचे मुख्याधिकारी विकास जिडगलवार, उपभियंता नितीन मुत्त्यलवार, देवराव भोंगळे, महेश देवकते, आशिष देवतळे, नामदेव डाहुले, राहुल संतोषवार, पोंभुर्णाच्या सरंपचा सुलभा पिपरे, उपाध्यक्ष अजित मंगळगिरीवार, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाचे सचिव अनिल बोरगमवार, कोषाध्यक्ष राजीव गोलीवार, विनोद देशमुख, अजय मस्के, गुरुदास पिपरे, दर्शन गोरंतीवार आदी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, येथील नागरिकांनी या क्षेत्राचा विकास करण्याचे दायित्व माझ्यावर सोपविले आहे. कधी नव्हे इतका निधी पोंभुर्णा तालुक्याच्या विकासाकरीता खर्च करण्यात आला आहे. आज येथे 42 कोटी 92 लक्ष रुपये खर्च करून विविध कार्यालयाचे लोकार्पण, आदिवासी मुला-मुलींच्या वसतीगृहाचे भूमिपुजन आणि पाणंद रस्त्यावरील आठ पुलांच्या बांधकामाची पायाभरणी करण्यात आली आहे.

यापूर्वीसुध्दा पोंभुर्णा येथे संत शिरोमणी जगनाडे महाराज सभागृह, महात्मा ज्योतिबा फुले सभागृह आणि वीर शहीद बाबुराव शेडमाके यांचे सभागृह बांधण्यात आले आहे. पुढे मुनगंटीवार म्हणाले, कमी लोकसंख्या असतांनासुध्दा पोंभुर्णा तालुक्यात विकासाची अनेक कामे करण्यात आली आहे. नगर पंचायतीच्या रस्त्यांकरीता तसेच ड्रेनेजसाठी पुन्हा 6 कोटी 40 लक्ष रुपये उपलब्ध करून दिले आहे.



राज्यातील सर्वात जलद विकास बल्लारपूर क्षेत्राचा झाल्याचा आनंद आहे. यापुढेही पूर्ण शक्तीने विकास कामे करण्याकरीता आपण कटिबध्द आहोत, अशी ग्वाही यावेळी त्यांनी दिली.

पोंभुर्णा तालुक्यात या विकासकामांचे झाले लोकार्पण, भुमिपूजन आणि पायाभरणी : पोंभुर्णा येथे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी वाचनालयाचे लोकार्पण (80 लक्ष), भूमी अभिलेख कार्यालय लोकार्पण (1 कोटी 86 लक्ष), आणि पोंभुर्णा येथे दुय्यम निबंधक कार्यालयाचे लोकार्पण (1 कोटी 14 लक्ष), आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृहाचे बांधकाम करणे (13 कोटी 54 लक्ष), आदिवासी मुलींची शासकीय वसतीगृहाचे बांधकाम करणे (13 कोटी 54 लक्ष), यासह पोंभुर्णा तालुक्यातील चेक हत्तीबोडी ते बोर्डा बोरकर येथील स्मशानभूमी जवळ नाल्यावर पुलाचे बांधकाम करणे, घनोटी नं. 1 ते आंबईकडे जाणाऱ्या रस्त्यावर नाल्यावर पुलाचे बांधकाम, घनोटी नं. 2 ते आंबेधानोरा येथील मोठया नाल्यावर पुलाचे बांधकाम, सातारा भोसले ते बालाजी तलावपर्यंत जाणाऱ्या मार्गावर पुलाचे बांधकाम, बोर्डा दीक्षित ते बोर्डा झुल्लुरवार रोडारील नाल्यावर पुलाचे बांधकाम, सातारा भोसले स्मशानभूमी ते बालाजी तलावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर  पुलाचे बांधकाम, जामखुर्द ते जानाळा रोडवर पुलाचे बांधकाम, दिघोरी ते वेळवा मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे याप्रमाणे प्रत्येकी 1 कोटी 50 लक्ष रुपये प्रति पूल असे एकूण 12 कोटी रुपयांच्या पुलाचे बांधकाम भुमिपूजन करण्यात आले.



# पिकाचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरसकट पीक विमा द्या : अक्षय पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव (जा.) :** यावर्षी जळगाव जामोद/संग्रामपूर तालुक्यामध्ये २२ जुलै २०२३ रोजी ढगफुटी झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन कापूस व आदी काही पिके पूर्णतः खराब झाली होती. अशा या परिस्थितीमध्ये आम्ही शेतकऱ्यांनी जगायचे कसे व आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा? हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला असतांनी पिक विमा कंपनी मात्र शेतकऱ्यांच्या थट्टा करतानां दिसत आहे. खरंतर तालुक्यामध्ये सर्वच शेतकरी बांधवांच्या पिकाचे नुकसान झाल्याचे दिसून येते परंतु पिक विमा कंपनी ज्या शेतकऱ्यांनी पिकाचा क्लेम केला त्यापैकी सुद्धा काहीच शेतकऱ्यांना तुटपुंज्या स्वरूपाचा पिक विमा देत आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांना पिकाचा क्लेम करण्यासाठी काही तांत्रिक अडचणी आल्या अशा शेतकऱ्यांना सुद्धा भरीव स्वरूपाचा देणे खूप महत्त्वाचा आहे. तरी पिक विमा कंपनीने कोणती अट न घालता शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा द्या अशी मागणी युवा आंदोलक अक्षय पाटील यांनी तहसीलदार मॅडम जळगाव जामोद त्यांच्या कडे केली.

यावेळी अश्पाक देशमुख, अजय गिरी, सोपान पाटील, गौतम तायडे, संतोष गणगे, सागर गवई, परशुराम घुले ,गजानन अढाव तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.

# वन शेतीशी निगडित वृक्ष उत्पादकांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वन शेतीशी निगडीत असलेल्या शेतकऱ्यांसाठी वन अकादमी, चंद्रपूर येथे वृक्ष उत्पादकांचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यातील शेतकरी तसेच पेपर, यांत्रिकी व बांबू निगडीत बल्लारपूर पेपर मील, शिरपूर पेपर मील, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, वनशेतीशी निगडीत रोपवाटिका यांचा समावेश होता.

यावेळी पुणे येथील सामाजिक वनीकरण विभागाचे अपर मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, वन अकादमीचे संचालक एम.एस. रेड्डी, नागपूर येथील सामाजिक वनीकरण संरक्षक किशोर मानकर, ताडोबाचे क्षेत्रीय संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर, नागपूर वनवृत्तातील सर्व विभागीय वन अधिकारी उपस्थित होते. उद्योगांनी वनशेती व त्यातील आर्थिक ताळमेळ याबाबत माहिती दिली. तसेच वनशेती कशी फायदेशीर आहे, याबाबत मार्गदर्शन केले. यानंतर बल्लारपूरच्या नर्सरीला भेट देऊन शेतक-यांना निलगीरी रोपे व त्याच्या संवर्धनाची माहिती देण्यात आली. यावेळी विभागीय वन अधिकारी बी.सी.येळे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. इंगळे, श्री. राजुरकर आदी उपस्थित होते.

# तेवीस व्यक्तींचा सावकारी परवाना रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** सावकारी परवान्याचे नुतनीकरण न केल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील 23 व्यक्तिंचा सावकारी परवाना रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे संबंधित व्यक्तिंना सावकारी व्यवसाय करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे. यात चंद्रपूर तालुक्यातील 11 व्यक्ती, राजुरा तालुक्यातील 6, ब्रम्हपूरी तालुक्यातील 2 तसेच भद्रावती, नागभीड, सिंदेवाही आणि चिमूर तालुक्यातील प्रत्येकी एका व्यक्तिचा समावेश आहे.

महाराष्ट्र सावकारी अधिनियम 2014 अन्वये सावकारी परवाना नुतनीकरण 31 मार्च 2023 पूर्वी करणे बंधनकारक असते. त्यानंतर दोन महिन्यांच्या मुदतीत म्हणजे 31 मे 2023 पर्यंत अतिरिक्त शुल्क 500 रुपये भरून नुतनीकरण करता येते. मात्र त्यानंतर आलेल्या अर्जावर संबंधित सावकाराचे सहायक निबंधक,  सहकारी संस्था हे अर्ज स्वीकारू शकत नाही. त्यामुळे सावकारी परवानाशिवाय संबंधित व्यक्तिंना सावकारी व्यवसाय करण्यास प्रतिबंध केला जातो. सध्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्यावतीने सावकारी परवाना रद्द करण्याची प्रकिया सुरू आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात असे एकूण 23 व्यक्ती असून त्यांचा परवाना रद्द करण्यात आल्याचे सावकाराचे जिल्हा उपनिबंधक प्रशांत धोटे यांनी कळविले आहे. सावकारी परवाना रद्द झालेल्या व्यक्ती : चंद्रपूर तालुक्यातील विलास पांडूरंग निखारे (गजानन महाराज मंदीर रोड, स्नेहनगर, चंद्रपूर), विनोद नारायण अलगेरवार (हनुमान मंदिराजवळ भिवापूर रोड, चंद्रपूर), ओम हायर परचेस प्रोप्रा, शंकर वासुदेव शेंडे आणि कवलजितसिंग इंद्रजितसिंग सलूजा (चंद्रपूर), अशोक राजम येरकल (लालपेठ कॉलरी नं. 1, नांदगाव रोड, चंद्रपूर), बलविरसिंग हरभजनसिंग चड्ढा (दीक्षित ले-आऊट, बापटनगर, चंद्रपूर), प्रकाश सिताराम गुंटेवार (सिव्हील लाईन, वॉर्ड क्र. 1, चंद्रपूर), सरीता राजेंद्र मालू (सिव्हील लाईन, चंद्रपूर), ईझी फायनान्स प्रोप्रा. शुभम मारोती खुसपरे (गजानन मंदीर वॉर्ड, चंद्रपूर), रामदेवबाबा फायनान्स प्रोप्रा. प्रशांत भास्करराव कोलप्याकवार (रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर) क्रिष्णा राज क्रिष्णन पी. क्रिष्णा स्वामी रेड्डी (तुकूम, चंद्रपूर) आणि निलेश मधूकर नावकर (बगड खिडकी, चंद्रपूर) राजुरा तालुक्यातील अनिल रामभाऊ गंप्पावार (रामनगर कॉलनी, राजूरा), राजेश बंडू यशुरवार (गडी वॉर्ड क्र. 1, राजुरा), नवनीत चंद्रकांत घट्टवार (राणा वॉर्ड क्र. 5 राजुरा), अवेज शकील अन्सारी (मौलाना आझाद, राजुरा), संदीप घनश्याम पडवेकर (रमाबाई वॉर्ड, राजुरा) आणि अंकूश अरविंद्र गंप्पावार (इंदिरा नगर, राजुरा). ब्रम्हपूरी तालुक्यातील राजेंद्र श्यामसुंदर काळबांधे (मु.पो. हळदा, ता. ब्रम्हपुरी) आणि हनुमंतराव मोनाजी राऊत (हळदा, ता. ब्रम्हपुरी). याशिवाय मार्गवी आनंद नायर (न्यू समठाना, भद्रावती), हमीद युसूफ शेख (मु.पो. तळोधी, ता. नागभीड), मंदा बबनराव येमुलवार (मु.पो. सिंदेवाही) आणि जयलक्ष्मी ज्वेलर्स प्रोप्रा सौरभ सुभाष येल्लेवार (मु.पो. भिसी, ता. चिमूर).



# महिला बचत गटाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**अमळनेर :**  येथे आज दिनांक 14 मार्च 2024 रोजी पंडित जवाहरलाल नेहरू समाज कार्य महाविद्यालय अमळनेर येथील MSW 2 क्षेत्रकार्य करणाऱ्या विद्यार्थ्या तर्फे महिला दिनाच्या निमित्ताने बचत गटाच्या महिलांसाठी मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन साने नगर तांबेपुरा अमळनेर येथे करण्यात आले होते. सर्व प्रथम प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी पुष्कर बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा .श्री तुषार सोनार , व पंडित जवाहरलाल नेहरू  समाज कार्य महाविद्यालयाचे व क्षेत्र कार्याचे मार्गदर्शक. प्रा. डॉ. भरत खंडागळे उपस्थित होते. यावेळी  श्री. तुषार सोनार यांनी  बचत गटातून महिलांचा विकास या विषयावर अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच MSW क्षेत्रकार्याचे मार्गदर्शक  प्रा.डॉ.भरत खंडागळे यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व, बदलत्या समाजात महिलांची होत असलेली भरारी आणि महिला सक्षमीकरणाचे महत्त्व यावर मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने साने नगर तांबेपुरा परिसरातील महिला बचत गटाच्या सदस्य सदर कार्यक्रमास उपस्थित होत्या. महिलांसोबत संवादाच्या माध्यमातून बचतगटाला येत असलेल्या अडचणी व स्वंयमरोजगार निर्मिती मधील समस्या समजून घेण्यात आल्या. यावेळी समाज कार्य महाविद्यालयाचे क्षेत्र कार्याचे विद्यार्थी  प्रदिप पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर सौ. वैशाली शिसोदे यांनी आभार मानले. उमेश पाटील, पूनम पाटील, वैशाली पाटील, श्याम पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# नृसिंह मंदिर व हनुमान मंदिर दोन्ही सभागृहांचे शेकुजी महाराज यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** आज खुलताबाद तालुक्यातील हनुमानवाडी दरेगाव येथे भारताचे अर्थराज्यमंत्री डॉ भागवत कराड साहेब व आमदार श्री प्रशांत भाऊ बंब यांच्या मार्गदर्शनाखाली हनुमान मंदीर सामाजिक सभागृह 10 लक्ष, व नृसिंह मंदिर (चांदा) सामाजिक सभागृह 10 लक्ष असे 20 लक्ष रुपयाचे सामाजिक सभागृहाचे उद्घाटन श्री शेकुजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका सरचिटणीस श्री शिवाजी गायकवाड, जिल्हा कार्यकारणी सदस्य श्री निलेश गायकवाड, श्रीमती ताराबाई दत्तू गायकवाड जिल्हा कार्यकारणी सदस्य महिला मोर्चा तथ ग्रामपंचायत सदस्य, अंकुश गायकवाड ग्रामपंचायत सदस्य, बाबासाहेब गायकवाड ग्रामपंचायत सदस्य, मिरलाल सोनवणे अनुसूचित मोर्चा तालुका अध्यक्ष, काकासाहेब गायकवाड युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष,  सखाराम गायकवाड, तातेराव गायकवाड, काशिनाथ आप्पा, अजिनाथ गायकवाड, सदाशिव गायकवाड, कडूबा आप्पा गायकवाड, रामदास गायकवाड, दत्तू गायकवाड, विष्णू गायकवाड, रंगनाथ गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, कॉन्ट्रॅक्टर अमोल गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, सचिन गायकवाड, योगेश गायकवाड, रामेश्वर गायकवाड, प्रवीण गायकवाड, संदीप गायकवाड, महादू गायकवाड, विनायक गायकवाड, शाम गायकवाड, जनार्दन गायकवाड, सारंगधर गायकवाड, मगण गायकवाड, सखाराम गायकवाड, शिवाजी गायकवाड, सुनील गायकवाड, अनिल गायकवाड, अवचित नाना गायकवाड, अजिनाथ सरपंच, त्रिंबक बाबा गायकवाड, धनजी गायकवाड यांच्यासह अनेक नागरिक या ठिकाणी उपस्थित होते.

# कळंब तालुक्यात धनगर समाजाची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील कळंब येथे झालेल्या या बैठकित अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच च्या वतीने मुंबई येथे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय सभेतील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीत न्यायालयीन लढाईला लागणारा निधी मोठ्या प्रमाणात जमा करणे तसेच संघटन बांधनी करणे या सह समाजातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली .

या बैठकीला डॉ. रामकृष्ण लोंढे व प्रबोधन मंचचे धाराशिव जिल्हा अध्यक्ष प्रा सोमनाथ लांडगे यांनी न्यायालयात आजपर्यंत घडलेल्या सर्व गोष्टींचा लेखाजोखा या वेळी समाजा समोर मांडला..

यशवंत सेनेच्या वतीने मुंबई येथे करण्यात आलेल्या आंदोलनात बंडु लांडगे राजेंद्र घाटुळे चंद्रशेन सुडके, यांना अटक करण्यात आली होती त्यामुळे त्यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या बैठकीला संतोष घाटुळे, अशोक शिंपले आप्पासाहेब कस्पटे, वाघमोडे सर,कवडे सर, यशवंत सेनेचे तालुका अध्यक्ष संभाजी हारकर ता उपाध्यक्ष ज्ञानेश्वर लीके ता सचिव झेलम शिंपले,संतोष कस्पटे, सुभाष मैदाड, पांडुरंग कवडे, ॲड. विश्वजीत दुगाने, ता संपर्क प्रमुख अनिल शिंपले यांच्यासह समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# निर्णय प्रक्रियेत महिलांना भाग घेण्याचा अधिकार दिला पाहिजे : प्रा. डॉ. कहाळे

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** महात्मा फुले समाजकार्य महाविद्यालय जालना व राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार यांच्या संयुक्त विद्यमाने अवतरला येथे सात दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आला आहे. यात बौद्धिक सत्रात महिला सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आला होते.
यावेळी अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. कहाळे सर यांनी एन. एस.एस. च्या विद्यार्थी व स्वयंसेवकान मार्गदर्शक करतांना म्हणाले की महिलांनच सक्षमीकरण करायचं असेल तर खऱ्या अर्थाने महिलांना निर्णय प्रक्रियेत निर्णय अधिकार दिला पाहिजे.
महिलांना सक्षम बनविण्यासाठी निर्णय घेण्याचं अधिकार कसा महत्त्वाचं आहे. यांचे उदाहरण देऊन त्यांनी मार्गदर्शन केले.
यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ वनंजे सर यांनी हि स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले यावेळी ते म्हणाले की समाजकार्याच्या विद्यार्थी व स्वयंसेवकानी महिला सक्षमीकरणासाठी कामं केलें पाहिजे व तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ हिवराळे सर यांनी महिला सक्षमीकरण या विषयावर स्वयंसेवकांन आपले सविस्तर विचार मांडताना म्हणाले कि देशाला व समाजाला प्रगती पथावर न्यायचं असेल तर महिलांना समसमान अधिकार देणें आवश्यक आहे.
यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवानी चौधरी यांनी केले. तर आभारप्रदर्शन स्नेहा पाटील यांनी केले. यावेळ डॉ. पी.टी. शिदे सर, प्रा डॉ गवळी सर, प्रा. डॉ. सुवर्णा चव्हाण मॅडम,प्रा. डॉ स्मिता चव्हाण मॅडम, तसेच कार्यालयीन कर्मचारी आर एस खरात, बी. आर. राठोड, जे. एन. महागडे मॅडम, के जी, कुरुगल, ए म्, शिंदे, डब्ल्यू वाघ, आर. टी. झोटे, म्हेत्रे, डि. एन. मदन, बी. पी. भालमोडे,श्री मानिक खरात व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी व स्वयंसेवक उपस्थित होते..

# डॉ.सरोजिनी राऊत यांना शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या वतीने पुरस्कार प्रदान


आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्ष तथा श्री लक्ष्मी बहुउद्देशीय सामाजिक संस्था हासेगावच्या अध्यक्ष डॉ. सरोजिनी राऊत यांना नुकताच शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त राज्यस्तरीय स्त्री सन्मान पुरस्कार २०२४ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी कोविड काळामध्ये मराठवाड्यातील तरुणांसाठी महाराष्ट्र पोलीस भरती साठी मोफत ऑनलाईन मार्गदर्शन शिबिराचे आयोजन, वृक्षारोपण, शेतकरी बांधवांना आधुनिक शेतीत विज्ञानाचा वापर यावर मोफत ऑनलाईन मार्गदर्शन शिबिराचे आयोजन, शिवजन्मोत्सवानिमित्त तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी बाबत ग्रामीण भागातील गरजूंना मार्गदर्शन, डिजिटल शिक्षणाचा प्रचार व प्रसार, स्वातंत्र सैनिकांचा सन्मान, गो संवर्धन व सेंद्रिय शेती मार्गदर्शन व कार्यशाळा आयोजन,बेटी बचाव बेटी पढाव उपक्रमांतर्गत सुकन्या समृद्धी योजना प्रचार व प्रसार करणे,गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे व शैक्षणिक साहित्याचे वाटप, महिला सक्षमीकरणासाठी कौशल्य विकास प्रशिक्षणाचे आयोजन, नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान उद्योजक महिलांचा सत्कार व महिला बचत गटांचे मेळाव्याचे आयोजन करणे, आदी गोष्टींचा विचार करून धर्मवीर आध्यात्मिक सेनेच्या वतीने राज्यस्तरीय स्त्री सन्मान पुरस्कार 2024 देऊन डॉ.नीलमताई गोरे उपसभापती विधान परिषद महाराष्ट्र, चंद्रकांतजी राठी वरिष्ठ अध्यात्मिक मार्गदर्शक आर्ट ऑफ लिविंग, शितलताई म्हात्रे शिवसेना उपनेत्या व प्रवक्त्या, अक्षय महाराज भोसले प्रदेशाध्यक्ष शिवसेना धर्मवीर अध्यात्मिक सेना यांचा हस्ते तापडिया नाट्यमंदिर, संभाजीनगर येथे नुकतेच सन्मानित करण्यात आले.



# शहरासाठी अजून ८५ तर भिंगारसाठी ९ कोटींचा निधी मंजूर : आ. जगताप

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** नगर शहरातील मूलभूत सोयी सुविधा विकास कामांसाठी राज्य शासनाने नव्याने 85 कोटी रुपयांचा तसेच भिंगार साठी नऊ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची आ. संग्राम जगताप यांनी पत्रकार परिषदेत सांगितली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निधीला मंजुरी दिल्यामुळे नगर शहरासह भिंगारचा आमदार जगताप यांच्या माध्यमातून कायापालट होण्यास मदत होईल. या निधीमुळे अनेक रस्त्यांचे भाग्य उजळणार आहे नवीन उद्याने, क्रीडांगणे, चौक सुशोभीकरण तसेच अन्य विकास कामे होणार आहेत अजित पवार यांनी आपल्या विश्वासू आमदाराला भरघोस विकास निधी देऊन नगर शहराच्या विकासाची नव्याने पायाभरणी केली आहे शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सुरू आहे विकास कामे करताना सर्वात मोठी अडचणी दिली असते आमदार संग्राम जगताप यांनी गेल्या काही काळात वरिष्ठ स्तरावर सातत्याने पाठपुरावा करून नगर शहरासाठी सर्वात मोठा निधी खेचून आणला आहे. सध्या राज्याच्या तिजोरीची चावी अजित पवार यांच्याकडे असल्यामुळे आमदार जगतापांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्र्यांनी निधी मंजूर केला आहे . नगर शहरातील डि पी रस्त्यासाठी नुकताच पहिल्या टप्प्यातील 150 कोटीचा निधी शासनाने मंजूर केला आहे त्या पाठोपाठ आता नगर शहरासाठी 85 कोटीचा निधी मंजूर झाला आहे त्यामुळे नगर शहरात येत्या काळात 235 कोटी रुपयांची विकास कामे मार्गी लागणार आहे .आमदार जगताप यांनी भिंगार शहराच्या विकासाचा शब्दही खरा करून दाखवला आहे भिंगार साठी प्रथमच राज्य शासनाकडून तब्बल नऊ कोटींचा निधी मिळाला आहे. संग्राम जगताप यांनी सुरुवातीपासूनच अजित पवार यांची साथ देण्याचा राजकीय निर्णय घेतला हा निर्णय नगरकरांसाठी लाभदायक ठरला आहे. यावेळी गणेश भोसले, संजय चोपडा, संपत बारस्कर, निखिल वारे, प्रकाश भागानगरे , विनीत पाऊलबुद्धे अविनाश घुले, अजिंक्य बोरकर बाळासाहेब बारस्कर, मुजाहिद कुरेशी व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, असेस टू जस्टिस प्रकल्प, महिला आर्थिक विकास महामंडळ आणि जिल्हा महिला व बालकल्याण कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्ह्यातील कर्तुत्ववान महिलांचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. नियोजन सभागृह येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) संग्राम शिंदे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक प्रदीप काठोळे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय साखरकर, रुलर ॲन्ड अर्बन डेव्हलपमेंट युथ असोसिएशनचे (रुदय) काशिनाथ देवगडे उपस्थित होते.
यावेळी मान्यवरांच्या हस्ते भरोसा सेलच्या पोलिस उपनिरीक्षक अपेक्षा मेश्राम, ब्रम्हपूरी येथील संरक्षण अधिकारी माधुरी भंडारे, जिल्हा महिला व बालकल्याण विभाागच्या संरक्षण अधिकारी कविता राठोड, वन स्टॉप सेंटरच्या केंद्र प्रशासन कल्याणी राठोड, दुर्गापूर पोलिस स्टेशनच्या लता वाडवे, जिवती येथील अंगणवाडी सुपरवायझर चंद्रकला उईके, पद्मापूर येथील अंगणवाडी सेविका अनुराधा साव, कल्पना राजुरकर यांना उत्कृष्ठ कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने सी.एम.आर.सी. महिलांना, एकात्मिक सेवा योजनेंतर्गत शहरी आणि ग्रामीण भागातील अंगणवाडी सेविकांचासुध्दा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दीपक बानाईत यांनी केले. संचालन कल्पना राजुरकर यांनी तर आभार महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक प्रदीप काठोळे यांनी मानले. यावेळी मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



# मोदी सरकार नावाची पिशवी जाळली

## संविधानाबद्दल अपशब्द : अनंत हेडगेच्या फोटोचीही होळी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** भारत सरकारच्या ऐवजी मोदी सरकार नावाची रेशन दुकानावर रिकामी पिशवी वाटप केल्या मुळे ऑल इंडिया पँथर सेनेतर्फे अनंत हेडगे यांनी संविधानाबद्दल अपशब्द केल्याने हेडगे यांच्या फोटो सहित मोदी सरकार नावाची पिशवी जळण्यात आली.

अनंत हेडगे बीजेपी खासदार यांनी संविधानाची अवमान केला म्हणून जिल्हा अधिकारी यांच्या कडे कारवाहीची मागणी करण्यात आली तसेच अमरावती येथील खानपुर येथील बौध्द समाजावर लाठीचार्ज केला म्हणून त्या पोलिसांची चौकशी करावी अशी मागणी देखील निवेदनद्वारे करण्यात आली.

कर्नाटकचे भाजपा खासदार अनंत हेडगे हे संविधान बदल करण्याचे भाष्य केले असून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. अनंत हेगडे हे म्हणतात, जर यावेळी बीजेपी सरकार आले तर संविधान बदलणार म्हणजे बदलणार ! या वक्तव्यामुळे भारत देशात हिंसक वातावरण घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, हेडगे यांच्यावर देशद्रोही गुन्हा दाखल करावा अशी मागणी केली.



अमरावती येथील खानपुर गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कमानीचा मुद्दा उपस्थित झाला असून बौध्द समाजाने गाव सोडले असून ते अमरावती येथील आयुक्त कार्यालय येथे गेले असून त्याच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. लाठीचार्ज करण्याचा आदेश कोणी दिला? याची माहिती द्यावी. व संबंधीत अधिकाऱ्याला निलंबित करण्यात यावे तसेच गेल्या 10-15 दिवसापासून रेशन दुकानांवर खाली बँग (पिशवीचे) वाटप होत आहे. त्या पिशवीवर 'भारत सरकार ऐवजी मोदी सरकार असा उल्लेख करण्यात आला आहे. त्या ठिकाणी भारत सरकार असा उल्लेख करण्यात यावा. आणि मोदी सरकार या नावाची पिशवी जाळून या सरकारचा ऑल इंडिया पँथर सेना जाहीर निषेध करण्यात आला.

# 'भावांतर' योजने शिवाय सोयाबीनला अच्छे दिन नाहीत

## विष्णुपंत भुतेकर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** शेतकऱ्यांसाठी सोयाबीन हे मुख्य पीक असून, बहुतांश शेतकऱ्यांच अर्थचक्र सोयाबीनवरच अवलंबून आहे. मात्र गेल्या दोन तीन वर्षापासून सदर शेतमालास कवडीमोल भाव मिळत असल्याने शेतकरी प्रचंड अडचणीत सापडला आहे. सोयाबीनला योग्य भाव मिळाल्या शिवाय शेतकऱ्यांची आर्थिक अडचण दुर होऊच शकत नाही. हे लक्षात घेऊन सरकारने ' भावंतर ' योजना राबविणे गरजेचे आहे. त्याशिवाय सोयाबीनला अच्छे दिन येणार नाहीत. असे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी म्हटले आहे.



राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी सोयाबीन भावा मुळे प्रचंड आडचणीत सापडलेला आहे. गेल्या दोन/तिन वर्षापासून अनेक शेतकऱ्यांकडे सोयाबीन साठवलेली आहे. आज बाजारात मिळणार्या भावात शेतकऱ्यांना सोयाबीन उत्पादनांसाठी लागणारा खर्च सुध्दा वसुल होत नाही. आशा परिस्थितीत सरकारने सोयाबीन या एका वानासाठी 'भावांतर' योजना राबवने गरजेचे आहे. हमी भाव चार हजार, सहासे विस रुपये क्विंटल आसतानां शेतकऱ्यांना केवळ चार हजार ते एकेचाळीसे रुपये क्विंटल ने सोयाबीन विक्री करावी लागत आहे. किमान हमी भाव आणि बाजारातील सध्याची विक्री यातील तफावत सरकारने शेतकऱ्यांना दिली पाहिजेत. शेतकर्यांना आठ हजार रूपये भाव आपेक्षीत आसतानां केवळ चार हजारावर शेतकऱ्यांची बोळवन केली जात आहे. सरकारने लोकसभा निवडणुकी पुर्वी निर्णय घेऊन सोयाबीन साठी भावांतर योजना लागु करावी अन्यथा सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडल्या शिवाय राहणार नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आसल्याचे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी म्हटले आहे.

# ४० देशांमध्ये 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा आवाज बुलंद

## पंचसूत्री राबवण्याचा ४१ देशांतील अध्यक्षांचा निर्धार

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** पत्रकार आणि पत्रकारितेच्या भवितव्यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने तयार केलेली पंचसूत्री आता जगभरातील ४१ देशांमध्ये राबवली जाणार आहे. त्यामुळे संघटनेची पाळेमुळे सातासमुद्रापार गेली आहेत, हेच नेपाळमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनातून स्पष्ट झाले आहे. जगातील ४१ देशांचे अध्यक्ष या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनात उपस्थित होते. या परिषदेमध्ये संघटनेच्या महासचिव दिव्या भोसले यांनी महाराष्ट्रभर राबविण्यात आलेल्या पत्रकारांच्या 'पंचसूत्री'ला घेऊन राबविल्या गेलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सलग चार दिवस विविध चर्चासत्रांच्या माध्यमातून संघटनेची माहिती जागतिक पातळीपर्यंत पोचविण्यात आली आहे. या ठिकाणी इतर देशांमधून आलेल्या अध्यक्ष, प्रतिनिधींनी त्या त्या देशात संघटनेची उद्दिष्टे, ध्येयधोरणे भूमिका पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. संघटनेचा भारतामधील महाराष्ट्र राज्यातला 'बुलढाणा पॅटर्न' देखील यावेळी प्रामुख्याने अधोरेखित करण्यात आला. ही सर्व कामगिरी आता पहिल्या टप्प्यात ४१ देशांमध्ये राबवली जाणार आहे. संघटनेच्या आंतरराष्ट्रीय धोरणाचा दुसरा टप्पा जर्मनीमध्ये, तर तिसरा टप्पा अमेरिकेतील डल्लास येथे होणार आहे. त्या माध्यमातून संघटनेचे काम जगभरातील १९५ देशांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट आहे. संघटनेच्या कृतिशील व मिळत असलेल्या यशामुळे संघटना जागतिक पातळीवर पोहोचली आहे, असे समाधान दिव्या भोसले यांनी व्यक्त केले. मीडिया क्षेत्रातील भारतातून एखादी संघटना जागतिक पातळीवर पोहोचण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.



**ही तर 'व्हॉईस ऑफ मीडिया'ची आंतरराष्ट्रीय सुरुवात : संदीप काळे** : नेपाळमध्ये आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनासाठी खूप चांगला प्रतिसाद मिळाला. या संमेलनात मीडिया क्षेत्रातील समस्या, उपाययोजना, 'व्हॉईस ऑफ मीडिया'ने भारतात सुरू केलेली वाटचाल यावर सविस्तर चर्चा झाली. अनेक देशांमध्ये पत्रकारांचे प्रश्न वेगळे आहेत. मूलभूत प्रश्न मात्र स्वातंत्र्याचा आहे. आपण राबविलेली पंचसूत्री हा देखील विषय जगभरात राबवला जाऊ शकतो, असा विश्वास आहे. आपल्या संघटनेच्या संकल्पनांचा स्वीकार जगभरातील देशांनी करणे यातच आपल्या संघटनेच्या यशाचे गमक आहे.
हे पत्रकार संमेलन ही तर 'व्हॉईस ऑफ मीडिया'ची आंतरराष्ट्रीय सुरुवात, अशी भावना यावेळी 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी व्यक्त केली. **या देशांचे प्रतिनिधी होते आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनासाठी** : जगभरातील ४१ देशांतील 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे अध्यक्ष या आंतरराष्ट्रीय पत्रकार संमेलनासाठी उपस्थित होते. हे देश पुढील प्रमाणे : नेपाळ, फ्रान्स, फिलिपिन्स, तुनीशिया, बांग्लादेश, चीन, बेल्जियम, इराण, तुर्की, स्पेन, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, मलेशिया, मॅनमार, अर्जेंटीना, थायलंड, जॉर्डन, सीरिया, कॅनडा, युएस, इराक, स्वित्झर्लंड, इंडोनिशिया, मोरक्को, झिम्बाब्वे, श्रीलंका, भूतान, मालदीव, अफगाणिस्तान, म्यानमार, ब्राझील, जॉर्डन, मेक्सिको, पॅलेस्टाईन, जर्मनी, इटली, त्रिनिदाद टोबॅगोचे, मोनॅको.

# परतूर परिसरात अवैध धंदे सर्रास सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** लालुक्यातील परतूर, वाटूर आणि परिसरात ऑनलाईन ऑफलाईन मटका जुगार सद्या जोरात सुरू आहे. थातूरमातूर कारवाई करून प्रश्न मिटविला जातो. परत परत मटका जुगार जोर धरू लागतो यामध्ये मटका घेणारा कमिशन मारतो आणि गोरगरिबांचे जीव जाळतो मटका, पत्ते आणि दारु अड्डे असेच बरेच अवैध धंद्याने वाटूर, परतूरमध्ये डोके वर काढले आहे. यावर कुठलीच कारवाई दिसत नाही गलो गल्ली ते गावोगावी एजंटाचा सध्या सूळ सुळाट दिसत आहे. गेल्या काही दिवसात अनेकांचे संसार उघड्या वर आले आहेत. याला लवकरच आवर घालावी अशी माता भगिनी ची हाक आहे. पोलीस अधीक्षक अक्षय बन्सल साहेब अवैध धंदे चालवणाऱ्याला कोणा वरिष्ठ आधिकर्यांचे पाठबळ तर नाही ना असा प्रश्न नागरिकाला पडला आहे.



# दासू वैद्य यांना दुःखी पुरस्कार, इंद्रजित घुले यांना ना. धों. महानोर साहित्य पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** कै. नंदकिशोर साहनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि अनुभव प्रतिष्ठान जालना यांच्या वतीने दिल्या जाणाऱ्या राज्य काव्य, साहित्य पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली.

प्रसिद्ध उर्दू शायर राय हरिश्चंद्र साहनी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मागील 25 वर्षांपासून दिला जाणारा अत्यंत प्रतिष्ठेचा 'दुःखी' राज्य काव्यपुरस्कार यंदा मराठीतील महत्त्वाचे कवी, गीतकार दासू वैद्य यांना कवितेतील समग्र योगदानासाठी जाहीर करण्यात आला आहे. 25 हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच कवी ना. धों. महानोर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'ना. धों. महानोर' राज्य साहित्य पुरस्कार दिला जाणार असून, मंगळवेढ्याचे इंद्रजित घुले यांना जाहीर झाला. 5 हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे





पुरस्काराचे स्वरूप आहे. मान्यवरांच्या उपस्थितीत दोन्हीही पुरस्कारांचे वितरण गुढी पाडव्याच्या दिवशी 9 एप्रिल 2024 रोजी संध्याकाळी 7 वा. जालना येथे 'कवितेचा पाडवा' या कार्यक्रमात केले जाईल, अशी माहिती ट्रस्टचे अभय साहनी, विनीत साहनी, कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर व पंडितराव तडेगावकर यांनी दिली आहे.

# साहित्य अकादमी महोत्सवात प्रा. गायकी निमंत्रित

## ११ ते १६ मार्च दरम्यान नवी दिल्लीत साहित्य संस्थेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** भारत सरकार सांस्कृतिक मंत्रालयाद्वारे संचालित साहित्य अकादमी या संस्थेच्या साहित्य सेवेला ७० वर्षे पूर्ण झाले.त्यानिमित्ताने ११ ते १६ मार्च दरम्यान नवी दिल्ली येथे साहित्योत्सव आयोजित करण्यात आला आहे. १७५ पेक्षा जास्त सत्रामध्ये होणाऱ्या या साहित्य संमेलनात एक हजारांवर साहित्यिक सहभागी होणार आहे. या महोत्सवात बुलढाणा येथील आदिवासी साहित्यिक, कवी चित्रपट गीतकार, प्रा. डॉक्टर गोविंद गायकी यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या साहित्य संमेलनाची गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद होणार असून, समकालीन भारतीय साहित्यावर चर्चासत्र, त्याचप्रमाणे विविध बोलीभाषेतील भारतातील समकालीन कवीचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. प्रा. डॉ.गोवींद गायकी हे सातपुड्यातील आदिवासी बोली भाषेचे अभ्यासक असून, आदिवासी जाणिवेची कवी आहेत. त्यांनी आसूड, तांडा बिरसा मुंडा,सरकती इ. चित्रपटासाठी गीत लेखन केले आहे. सन २०१९ चा स्व. दादासाहेब फाळके गोल्डन कॅमेरा पुरस्कार हा त्यांच्या आसूड चित्रपटातील गीताला प्राप्त झाला असून, त्यांच्या आदिवासी लोकगीतांचे अंतरवेंध या पुस्तकाला अनेक साहित्य पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



# सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपये दरमहा द्यावेत

## दिनकर पुरी यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना दर मासिक महिन्याला केंद्र सरकारने व राज्य सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रती महिना द्यावा शेतकरी संघटनेचे युवा नेता सचिन दिनकरराव पुरी यांनी आठ वर्षे लगातार निवेदनाद्वारे आंदोलन, तसेच वेळो वेळी ऊपोषन करून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या विरोधात वेळो वेळी आंदोलन सुरू करून दिली. आज आता राज्य सरकारने शेतकऱ्यांना दर महा पाचशे रुपये व केंद्र सरकारचे पाचशे रूपये प्रति महिना शेतकरी वर्ग लोकांच्या खिशात पाड्ला आहेत फूल ना फुलाची पाकळी, पाकळी मुळाल्याने आनंद व्यक्त करीत आहे. शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच पदाधिकारी यांनी सरपंच तसेच ग्रामीण शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आठ वर्षे पुर्वी जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना दर मासिक महिन्याला केंद्र सरकारने व राज्य सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपये प्रती महिना द्यावा व श्री कुसुमताई दिनकरराव पुरी ऊर्फ मातोश्री यांच्या आदेशानंतर त्यांचे लहान मूलगा तसेच शेतकरी संघटनेचे युवा नेते श्री सचिन दिनकरराव पुरी यांनी आठ वर्षे लगातार निवेदनाद्वारे आंदोलन, तसेच जिवाची पर्वा न करता वेळो वेळी ऊपोषन करून केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या विरोधात वेळो वेळी आंदोलन सुरू करून दिली आज आता राज्य सरकारने शेतकर्यांना दर महा पाचशे रुपये व केंद्र सरकार चे पाचशे रूपये प्रति महिना शेतकरी वर्ग लोकांच्या खिशात पडत आहे फूल ना फुलाची पाकळी या मातोश्रींच्या सांगण्यावरून शेतकरी संघटनेचे युवा नेते श्री सचिन कुमार दिनकरराव पुरी यांना यश आले तसेच श्री सचिन कूमार दिनकरराव पुरी हे जवळ जवळ आठ ते दहा संघटनेत कार्यरत असून प्रत्येक वेळी शेतकरी संघटनेचे प्रश्न सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहतात त्यांची मुलाखत घेतली असता त्यांनी स्पष्ट केले केले कि मि कोणत्या ही नेत्या पूढे अथवा पक्षांपुढे झुकणार नाही प्राणांची बाजी लावू पन शेतकरी वर्गाला न्याय, हक्क व लाभ जरुर मिळवून देवू आम्ही कोनाला घाबरत ही नाही व कोनापूढे झुकणार ही नाही मग तो आमदार असो वा खासदार शेतकरी हाच एकमेव देशाचा राजा आहे तो कोनापूढे झुकणार नाही असे मत व्यक्त केले युवा नेते श्री सचिन कुमार दिनकरराव पुरी यांनी व्यक्त केले, पाच वर्षा पूर्वी गावात दुष्काळ पडला होता त्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालया समोर उपोषण



केले व त्वरीत शासकीय यंत्रणेवर आकर्षित करून उपोषण विटा ता कन्नड नगरीत पिण्याचे पाणी पुरवठा येऊ स्तर युवा नेते श्री पुरी यांनी उपोषण सोडले नह्वते त्यांचे एकदम साधे राहणीमान मनमिळाऊ स्वभाव व जशास तसे उत्तर देणारे श्री सचिन कुमार दिनकरराव पुरी यांचा आज शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय पदाधिकारी यांनी या कार्याची दखल घेत त्यांचा सत्कार करण्यात आला संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रथम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन देनारे पहिले शेतकरी संघटनेचे युवा नेते आहेत या कार्याची दखल घेत सर्व शेतकरी बांधव व नेते यांनी त्यांचा सत्कार क्रुषणकूंज पुरी वस्ती शेजारी करण्यात आला व हि लढाई माझी एकट्याची नसून सर्व शेतकरी बांधवांची आहे हि लढाई खास आमच्या मातोश्रींच्या सांगण्यावरून व आदेशानुसार करण्यात आली,त्याच सोबत वीटा येथे शेतकरी संगटनेची शाखेचे उटघाटन ही करण्यात आले. कृषी सन्मान निधी वाढवण्या बाबत, मेघा भरती काढण्या बाबत, नुकसान भरपाई जास्त प्रमाणात भेटण्या बाबत; तहसीलदार यांना सादर करण्यात आले निवेदन. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना निवेदन करून मांगनी केले की कृषी सन्मान निधी किमान केंद्र सरकारने 3000 हजार रुपये व राज्य सरकारने 3000 हजार रुपये प्रती महिना देण्यात यावा जेणेकरून शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबतील व शेतकरी राजा सुखी होईल.

तसेच शेतकऱ्यांना सरकारने मोफत खते व बी बियाणे द्यावे जेणेकरून शेतकऱ्यांना खाजगी व्याजाने पैसे न काढता शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबतील. केंद्र शासनाने व राज्य शासनाने त्वरित मेघा भरती मोठ्या प्रमाणात काढावी तसेच वयाची अट ही 40 वर्षे पर्यंत करावी ही विनंती

आमचे निवेदन त्वरित केंद्र सरकार ने व राज्य सरकारने मान्य करवे ही मी भारताचे माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी साहेबाना तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री शिंदे साहेबाना आम्हा सर्व भारतीय शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या विनंत्या त्वरित्त मान्य करव्या ही नम्र विनंती .

अन्यथा आम्हाला सर्व शेतकऱ्यांना व सुशिक्षित बेरोजगार तरुणांना अमरण उपोषण आथवा आत्मदहन करण्यास भाग पडू नये ही अशी विनंती निवेदना द्वारे करण्यात आली आहे.

# भोकरला मतदार यादीबाबत बैठकीस प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आगामी काळात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकी संदर्भात कर्मचारी व अधिकारी सहभागी होतात म्हणून निवडणुक आयोगाने २३ जानेवारी २०२४ रोजी मतदार यादी प्रसिध्द केली आहे. विधानसभा निहाय मतदार यादी नुसार नांदेड लोकसभेची निवडणूक होणार असल्याने या कार्यक्रमाच्या कालावधीत नव्याने मतदार यादीत नावे समाविष्ट करणे अथवा वगळणे तसेच मतदार यादीत नाव समाविष्ट आहे याची खात्री करून घेणे याबाबतची माहिती देण्या करण्या करिता तहसील कार्यालयात विविध मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती.



१ जानेवारी २०२४ पर्यंत वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या नागरिकांनी आपल्या नावाची नोंदणी अर्ज नमुना ६ भरून करून घ्यावी तसेच लोकसभेच्या निवडणूकीत मतदार यादीत नाव समाविष्ट नाही म्हणून मतदान करता आले नाही अशी स्थिती उद्‌भवू नये याकरिता मतदार यादीत आधीपासूनच नाव नोंदीत असलेल्या प्रत्येक मतदाराने आपले नाव मतदार यादीत आहे हे गृहित न धरता आपले नाव असल्याची खातरजमा करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार घोळके यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.लोकसभा च्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी वापरण्यात येणार असल्याने सर्व राजकीय पक्षांनी ही मतदार यादी सुयोग्य व परिपूर्ण होण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार घोळवे यांनी केले.बूधवारी दुपारी १२ वाजता तहसील कार्यालयातील सभागृहात आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने नांदेड लोकसभा मतदारसंघा अंतर्गत भोकर विधानसभा मतदारसंघातील विविध राजकिय पक्षाच्या अध्यक्षा ची आढावा बैठक घेण्यात आली. मतदार यादी, स्थलांतरित मतदार यादी, मयत मतदार यादी, व्हीआयपी मतदार यादी, दिव्यांग मतदार यादी,आदी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. आगामी नांदेड लोकसभा निवडणूक यशस्वीरीत्या पार पडावी, यासाठी राजकिय पक्षानी सहकार्य करावे असे आवाहन तहसीलदार घोळवे यांनी केले. या वेळी निवडणुक विभागाचे वरिष्ठ लिपीक दिलीप कावळे ,सहायक कर्मचारी के व्ही गिते सह सर्व राजकिय पक्षाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# बालरक्षक सक्षमीकरण रत्नाळी केंद्रस्तरीय दोन दिवसीय प्रशिक्षण संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांच्याकडून धर्माबाद पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या रत्नाळी केंद्रस्तरीय बालरक्षक सक्षमीकरण दोन दिवसीय प्रशिक्षण दि.१२ मार्च १३ मार्च रोजी कस्तुरबा गांधी बालिका वसतिगृह येथे संपन्न झाले. पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी रविशंकर मरकंटे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रप्रमुख आबासाहेब उस्केलवार व सुलभक डॉ. पी.जी.पालंचेवार यांनी बालरक्षक सक्षमीकरण प्रशिक्षणात बालकांना मुलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे याकरिता संयुक्त राष्ट्र संघाने सन १९८९मध्ये बालहक्कासंदर्भात बाल हक्क संहिता स्वीकारली असून त्याद्वारे सर्व बालकांना मुलभूत मानवी हक्क मिळवण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे.



जसे जीवितांचा अधिकार, शारीरिक व बौद्धिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार त्यांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावांपासुन संरक्षणाचा अधिकार तसेच कौटुंबिक व सांस्कृतिक व सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार इत्यादी बालकांचे हे विशेष हक्क आहेत.जे बालक १८ वर्षांखालील आहेत त्या सर्वांना लागू आहे.बालकांना विकासाची संधी मिळावी म्हणून प्रत्येक बालकाला कोणकोणत्या गोष्टी मिळाव्यात आणि कोणकोणत्या गोष्टी बालकांसाठी टाळायला हव्यात हे बालकांच्या स्वरूपात मांडले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९७९ते १९८९ अशी अशी दहावर्षे वेगवेगळ्या राष्ट्रातील मुलांना स्थितीचा आढावा घेण्यात आला.त्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत दि.२० नोव्हेंबर १९८९ रोजी बाल अधिकार संहितेला ओळखला जातो.संयुक्त राष्ट्र संघटनेच्या ५४ कलमांच्य बाल अधिकार संहितेला भारत सरकारने मान्यता दिली आहे.या कलमांपैकी १ते ४२ कलमे मुलांचे निव्वळ अधिकार आहे.बालकांचे हक्क – जगण्याचा अधिकार, सहभागाचा अधिकार, संरक्षणाचा अधिकार या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणासाठी रत्नाळी केंद्रातील १८ शिक्षक उपस्थित होते.

# पंतप्रधान मोदींच्या विजयासाठी आध्यात्मिक आघाडी सज्ज : संत आशीर्वाद अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**सूक्ष्म नियोजनावर भर :** पंतप्रधान मोदींना भाजपाच्या ' अबकी बार ४०० पार 'साठी आध्यात्मिक आघाडी देखील सज्ज झाली असून महाराष्ट्रातील ४८ लोकसभांच्या विजयासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले .आध्यात्मिक समन्वय आघाडीचे सर्व पदाधिकारी पुढील महिनाभर आपले घरदार सोडून राज्यभरातील सर्व साधुसंत महंत कीर्तनकार प्रवचनकार यांच्या भेटी घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या तिसऱ्या काळासाठी आशीर्वाद मागणार आहेत . एकूण पाच हजारपेक्षा जास्त साधुसंत कीर्तनकारांपर्यंत पोहोचण्याचे विशेष नियोजन आजच्या बैठकीत करण्यात आले .



**छत्रपती संभाजीनगर :** यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा नावलौकिक जगभरात वाढतच चालला आहे. तळागाळातील प्रत्येक घटकांना शासकीय योजनांचा लाभ मिळत असून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी यांनाच बसवण्याचा संकल्प भाजपा आध्यात्मिक आघाडीच्या वतीने करण्यात आला.

श्रीकृष्ण मंदिर महानुभाव आश्रम येथे बुधवारी ( १३ मार्च ) भाजपा अध्यात्मिक समन्वय आघाडीची प्रदेश पदाधिकारी बैठक आध्यात्मिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष आचार्य तुषार भोसले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. दिवसभर चाललेल्या या बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली.

बैठकीच्या उदघाटनप्रसंगी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड साहेब आणि माजी विधानसभा अध्यक्ष आमदार हरिभाऊ बागडे नाना उपस्थित होते.

राज्यभरातून आलेले प्रदेश पदाधिकारी व विविध पंथ संप्रदायांचे एकूण ८० सदस्य बैठकीस उपस्थित होते. या बैठकीत सर्वानुमते दोन ठराव मंजूर करण्यात आले.

रामराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे अभिनंदन या प्रस्तावास पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी राबविलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांचा उहापोह करण्यासोबतच त्यांनी सनातन संस्कृतीला सन्मान दिला. राम मंदिराची उभारणी केली व देव, देश, धर्मासाठी अहोरात्र संकल्प घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले व पुन्हा एकदा पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा शपथ घ्यावी यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या हा प्रस्ताव राजेश महाराज देगलूरकर यांनी मांडला व त्यास आचार्य मनीष भाईजी महाराज व डॉ.वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांनी अनुमोदन दिले.

सर्व जातींना त्यांच्या हक्काचे अधिकार प्रतिनिधित्व व न्याय मिळावा व त्यासाठी त्यांनी संविधानिक मार्गाने आपली बाजू मांडावी या गोष्टीस आध्यात्मिक समन्वय आघाडीचे पूर्ण समर्थन आहे. मात्र दोन जाती एकमेकांविरोधात उभे करणे, जाळपोळ करणे, राजकीय नेत्यांना शिवीगाळ करणे, त्यांना जातीय वाचक संबोधने, या गोष्टीचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. ज्ञानोबा तुकोबांपासून स्वामी चक्रधर पंथपर्यंत व छत्रपती शिवरायांपासून शाहू-फुले-आंबेडकरांपर्यंत अशा थोर विभूतींची भूमी असलेल्या महाराष्ट्रात हा विषारी जातीयवाद कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही व तो मिटवण्याचा निर्धार अध्यात्मिक समन्वय आघाडी करत आहे.

हा प्रस्ताव ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ यांनी मांडला व त्यास ह.भ.प. संजय नाना महाराज धोंडगे महंत. राधाताई सानप महंत केशराज बाबा महानुभाव यांनी अनुमोदन दिले.या बैठकीचे प्रास्ताविक मराठवाड्याचे अध्यक्ष मा.जि.प अध्यक्ष रामराव शेळके यांनी केले तर प्रदेश सहसंयोजक संजय जोशी यांनी आभार मानले. सुदर्शन महाराज महानुभाव यांनी सूत्रसंचलन केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# बोरवंटी येथे शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठन बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** तालुक्यातील जि. प.प्राथमिक शाळा बोरवंटी येथे दि.१२/०३/२०२४ रोजी शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठण बैठक पार पडली.

या बैठकीसाठी शा व्य समितीचे माजी अध्यक्ष सदस्य व डोंगरे वैजिनाथ रघुनाथ तसेच सर्व पालक तसेच गावातील नागरिक उपस्थित होते .

खेळीमेळीच्या वातावरणात बैठकीस सुरुवात झाली. बैठकीचे प्रास्ताविक श्री थळकर सर यांनी केले. यामध्ये SMC ची कामे , शाळेतील जबाबदारी, सहकार्य करणे , शाळेतील विविध कार्यक्रमात सहभागी होणे , शाळेतील अडचणी सोडविण्यासाठी तत्पर राहणे अशा बऱ्याच गोष्टी सर्व पालकांना सांगितल्या . प्रास्ताविका नंतर शाळेचे मु अ मदिकुंटावार सर यांनी बैठकीची सूत्रे हाती घेवून. शासननिर्णयाप्रमाणे SMC गठीत करावयाची आहे हे सांगून प्रत्यक्ष जातवार - वर्गवार आरक्षणाचे वाचन केले. त्यामध्ये प्रत्येक वर्गाला, पुरुष -महिलांना समान संधी मिळेल या दृष्टीने तंतोतत नियोजन केले होते. ते सादर करून प्रत्यक्ष निवडीस सुरुवात झाली. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात सर्व सदस्यांची निवड झाली. नंतर त्यातून सर्वानुमते नूतन SMCअध्यक्ष म्हणून इंगळे रणजीत बाळासाहेब यांची बिनविरोध तर उपाध्यक्ष म्हणून श्रीमती शहाणा आखलाख पठाण यांची निवड झाली तसेच सदस्य म्हणून श्री.डोंगरे काशिनाथ रघुनाथ, कुंभार तानाजी विठ्ठल,श्रीशेख जमीर रफियोद्दीन,मुरगे शांतलिंग शेषेराव, श्रीमती. मुजमुले किरण भारत, श्रीमती धानवडकर वंदना सुखदेव, श्रीमती भुईटे अर्चना चंद्रकांत यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर अध्यक्ष / उपाध्यक्ष व सर्व सदस्यांचा शाळेतर्फे सत्कार करण्यात आला. बैठकीच्या शेवटी नूतन शालेय व्यवस्थापन समितीला शाळेतर्फे मुअ मदिकुंटावार सर यांनी गुणवत्तेची त्याचबरोबर संपूर्ण समर्पणाची हमी देवून सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता होऊन शेवटी चहापानानंतर कार्यक्रम संपला.





## वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणचा ३३०० मेगावॅट हरित ऊर्जा खरेदीचा करार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील वाढती कमाल वीज मागणी पूर्ण करण्यासाठी ३३०० मेगावॅट हरित ऊर्जा खरेदीसाठी महावितरणने बुधवारी मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सतलज जल विद्युत निगम लिमिटेड तसेच नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशन यांच्यासोबत दोन करार केले. वीज खरेदीचा दर माफक असल्याने वीज खरेदी खर्चात बचत होणे अपेक्षित असून त्यामुळे विजेचा दर मर्यादित ठेवण्यास मदत होईल, असे यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र, मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, महावितरणचे संचालक अरविंद भादीकर, प्रसाद रेशमे आणि योगेश गडकरी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महावितरणतर्फे ग्रीन एनर्जीवर भर दिला जात आहे. ही चांगली बाब असून पर्यावरण रक्षणासोबतच ही स्वस्त ऊर्जा महाराष्ट्राच्या ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. देशातील बॅटरी स्टोरेज आधारित ग्रीन एनर्जीचा वापर पीकिंग अवर्समध्ये म्हणजे कमाल मागणीच्या वेळी होणार आहे त्यामुळे सौर ऊर्जा उपलब्ध नसतानाच्या कालावधीत महाग वीज खरेदीची आवश्यकता राहणार नाही. या करारांमुळे नवीनीकरणीय ऊर्जा बंधनाचे लक्ष्य पूर्ण करण्यास मदत होईल. एकंदरित वीज खरेदी खर्चात बचत होऊन ग्राहकांना भविष्यात अधिक किफायतशीर दरात वीज मिळेल, ही चांगली बाब आहे.

महावितरणचे संचालक योगेश गडकरी आणि सतलज जल विद्युत निगम लिमिटेड चे कार्यकारी संचालक पवन वर्मा यांनी १८०० मेगावॅट नविनीकरणीय ऊर्जेसाठी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यामुळे १८०० मेगावॅटची अक्षय ऊर्जेवर आधारित स्टोरेज क्षमता निर्माण होणार असून ती कोणत्याही वीज वितरण कंपनीद्वारे आजवर करार झालेली संपूर्ण देशात सर्वाधिक क्षमता आहे.

योगेश गडकरी आणि नॅशनल हायड्रो पॉवर कॉर्पोरेशनचे महाव्यवस्थापक रणजीत ठाकूर यांनी १५०० मेगावॅट सौर ऊर्जेसाठी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. बुधवारी झालेल्या करारांमुळे वीज खरेदीमध्ये बचत होण्यासोबत हरित ऊर्जेसाठीची जबाबदारी पूर्ण करण्यात मदत होणार आहे. त्यामुळे 'नेट झिरो'चे उद्दीष्ट गाठण्यास मदत होईल. ही पर्यावरण पूरक ऊर्जा असल्यामुळे कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. महावितरणची विजेची मागणी सुमारे २५,४१० मेगावॅट असून वीज पुरवठ्यासाठी करार झालेली क्षमता आता ४१,५७० मेगावॅटवर पोहोचली आहे. त्यामध्ये अक्षय ऊर्जेसाठी करार झालेली क्षमता १४,५५१ मेगावॅट आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीज पुरवठा करणे आणि उद्योगांवरील क्रॉस सबसिडीचा बोजा कमी करणे यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० या कल्पक योजनेअंतर्गत महावितरणची नवीकरणीय ऊर्जा क्षमता ९,१५५ मेगावॅटने वाढणार आहे.

## श्रीक्षेत्र नेवासा पंचक्रोशी परिक्रमा दिंडीचे प्रस्थान; ज्ञानोबा माऊली तुकारामचा जयघोष

आधुनिक केसरी न्यूज




**पंचक्रोशी परिक्रमा दिंडीतील दैनंदिन कार्यक्रम :** प्रात : काळी मार्गस्थ झाल्यानंतर काकड़ा व गौळणी पर्यंतचे भजन, मध्यान्ही भोजन व विश्रांती, श्री ज्ञानेश्वरी प्रवचन पश्चात मार्गस्थ होऊन वारकरी नियमाचे भजन, हरिपाठ व मुक्कामी हरिकिर्तन असे पंचक्रोशी पायी दिंडीचे दैनंदिन कार्यक्रम रहाणार असल्याचे नंदकिशोर महाराज खरात यांनी यावेळी बोलताना सांगितले

**नेवासा :** देवदेवतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्री क्षेत्र नेवासा पंचक्रोशीचे महत्व कळण्यासाठी पंचक्रोशी परिक्रमा पायी दिंडी सोहळयास नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिरापासून बुधवार दि. १३ मार्च रोजी "ज्ञानोबा माऊली तुकाराम"व पुंडलिक वरदे हरि विठ्ठल श्री नामदेव तुकारामच्या जयघोष करत प्रस्थान झाले. पंचक्रोशी पायी दिंडी प्रस्थानाच्या पूर्वी माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे हभप रामेश्वर महाराज कंठाळे, वेदमूर्ती हभप भगवान महाराज जंगले शास्त्री, हभप ऋषिकेश महाराज वाकचौरे, रामायणाचार्य हभप नंदकिशोर महाराज खरात, शुभम महाराज कांडेकर हभप मोटे गुरुजी, गणेश महाराज चौधरी, गणेश महाराज आरगडे, रोहिदास महाराज सुसे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. पुंडलिक वरदा हरि विठ्ठल.... श्री ज्ञानदेव तुकाराम.. पंढरीनाथ भगवान की जय असा जयघोष करत ज्ञानोबा माऊली तुकाराम असा नाम जप करत टाळ मृदुंगाच्या गजरात पंचक्रोशी पायी प्रदक्षिणा दिंडीस सुरुवात करण्यात आली. संत ज्ञानेश्वर महाराज पैस खांब मंदिराचे निर्माते वैकुंठवाशी गुरुवर्य श्री बन्सी महाराज तांबे यांच्या कृपाशिर्वादाने व तमाम वारकरी संप्रदायातील महाराज व वारकरी यांच्या सहकार्याने पंचक्रोशी प्रदक्षिणा करण्यासाठी ही दिंडी निघाली. श्री संत ज्ञानेश्वर मंदिर श्री क्षेत्र नेवासा येथून सदरची दिंडी ही नेवासा फाटा, भानस हिवरा, रांजणगाव देवी, कारेगाव, वडाळा बहिरोबा , खरवंडी, तामसवाडी, वाटापूर, गोमळ वाडी, रामकृष्ण आश्रम गोणेगाव , पाचेगाव, बेलपिंपळगाव, सुरेगाव, भालगाव, गोधेगाव (किसनगिरी बाबा जन्मस्थळ) गोलांडे वस्ती, सिध्देश्वर मंदिर, प्रवरासंगम , सलाबतपुर, गोंडेगाव, रामनगर भेंडा खु., श्रीनागेबाबा मंदिर -श्रीक्षेत्र भेंडा बु., सौंदाळा, भानस हिवरा, नेवासा फाटा मार्गे पुन्हा श्री संत ज्ञानेश्वर मंदिर श्री क्षेत्र नेवासा येथे येईल त्यानंतर मंगळवार दि.१९ मार्च रोजी काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसाद वाटपाने या पंचक्रोशी प्रदक्षिणा दिंडीची सांगता होणार आहे.

## मराठा आरक्षणासाठी वीस वर्षीय युवकाची गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** आंतरराष्ट्रीय कबड्डीत आरक्षणामुळे दोन मार्कांने नंबर हुकला याचा मोठा मनस्ताप व आलेल्या नैराश्याने मराठा आरक्षणासाठी बजाजनगर संभाजीनगर येथे रहात असलेल्या वीस वर्षीय युवकाने नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथील गोदावरी नदीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. आई मराठा आरक्षणासाठी मी बलिदान देत असल्याचा व्हॉटसप मॅसेज करुन गोदावरी पुलावरून उडी मारुन तरुणाची आत्महत्या केली.याबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार बजाजनगर येथील महेश उर्फ ओम मोहन मोरे या युवकाने १२ मार्च रोजी रात्री ९ वाजे दरम्यान छत्रपती संभाजीनगर-अहमदनगर महामार्गावरील कायगाव टोका येथील गोदावरी नदीच्या पुलावर मोटारसायकल लावुन गोदावरीत उडी घेतली. आत्महत्या करण्यापूर्वी त्याच्या मातोश्रीला मोबाईलवरुन इंग्रजीमधून मॅसेज टाईप करून टाकला, मिस यु आई,जय व पप्पा मी मराठा आरक्षणासाठी जीव देत आहे.समाजासाठी एक जीव माझा पण, जय तु आईसोबत कायम रहा,माझा मम्मी मध्ये खुप जीव आहे,पुढे चांगली जिंदगी जगा,आय लव्ह मम्मी असा मॅसेज आईच्या मोबाईलवर टाकून गोदावरी नदीच्या पुलावरून मराठा आरक्षणासाठी महेश मोरे या युवकाने उडी मारून आत्मबलिदान केले. त्याचा मृतदेह बुधवारी १३ मार्च रोजी दुपारी १२ वाजता सापडला असुन नेवासे फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात येऊन मृतदेह नातेवाईकाच्या ताब्यात देण्यात आला.नेवासा पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक धनंजय जाधव, पोलीस उपनिरीक्षक शैलेंद्र ससाणे हे.कॉ.बर्डे, माने, राम वैद्य, अरविंद वैद्य,मराठा आरक्षण कृती समितीचे मराठा आंदोलक जेष्ठ विधी तज्ञ अँड.के.एच.वाखुरे,भाऊसाहेब वाघ, राजू उंदरे,दादा निपुंगे,संभाजी सोनवणे,मुकिंदपुरचे सरपंच सतीश निपुंगे, राजेंद्र उंदरे,प्रकाश निपुंगे यावेळी उपस्थित होते.

